


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६४ वे * अंक २८५ * नांदेड * रविवार, दि. २६ ऑक्टोबर २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

## ‘न भूतो न भविष्यती’ मोर्चा झाला पाहिजे, दिल्लीनेही दखल घेतली पाहिजे अशी तयारी करा

### राज ठाकरेंचा मनसैनिकांना आदेश

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील विरोधकांनी निवडणूक आयोगाच्या विरोधात आता एल्गार पुकारला आहे. विरोधकांनी रस्त्यावर उतरून आपला आवाज उठवण्याचा निर्धार केला आहे. १ नोव्हेंबरला विरोधक मुंबईत निवडणूक आयोगाच्या विरोधात विराट मोर्चा काढणार आहेत. या मोर्चात महाविकास आघाडीसोबतच महाराष्ट्र नवनिर्माण सेना देखील सहभागी होणार आहे. या पार्श्वभूमीवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पक्षाच्या सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांची ‘शिवतीर्थ’ निवासस्थानी तातडीची बैठक बोलावली होती. या बैठकीत राज ठाकरे यांनी आगामी मोर्चा यशस्वीपणे पार पडण्यासाठी मनसेच्या नेत्यांना मार्गदर्शन दिले. बैठकीला बाळा नांदगावकर, अविनाश अभ्यंकर, अभिजीत पानसे, अविनाश जाधव, गजानन काळे, यशवंत किल्लेदार यांच्यासह मनसेचे प्रमुख नेते उपस्थित होते.

राज ठाकरे यांनी बैठकीत सांगितले की, हा मोर्चा सत्तेसाठी नाही, तर सत्यासाठी आहे, आणि हा मोर्चा खोट्या मतदारांसाठी नाही, तर खऱ्या मतदारांसाठी आहे. त्यांनी नेत्यांना निर्देश दिले की, गल्ली ते दिल्ली मोर्चाची दखल घ्यायला भाग पाडा, असे त्यांनी म्हटले. याशिवाय, राज ठाकरे यांनी बैठकीत आदेश दिला की, मोर्चाचे आयोजन न भूतो न भविष्यती असा ठोस व प्रभावी प्रकारे करावे. राज ठाकरे यांच्या सूचनांनंतर मनसेचे नेते आणि पदाधिकारी मोर्चाच्या यशस्वी आयोजनासाठी जोमाने तयारी लागले आहेत.

दरम्यान, (पान ६ वर...)

## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका लढविण्यासाठी सज्ज रहा –उपमुख्यमंत्री अजित पवार

### गोरठेकर बंधूंचा अजित पवार गटात प्रवेश

**नांदेड (प्रतिनिधी)–** भाविष्यात कोणावरही पश्चातापाची वेळ येणार नाही. अन्याय होणार नाही, याची काळजी घेऊन जुन्या पदाधिकाऱ्यांचा आदर तर नव्यांचा सन्मान केला जाईल, असे आश्वासन देत स्थानिक स्वराज्याच्या संस्थेच्या निवडणुका पूर्ण ताकदीने लढविण्यास सर्वांनी सज्ज राहावे, असे आवाहन राष्ट्रवादी पक्षाचे नेते तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. गोरठेकर बंधूंच्या पक्षप्रवेश सोहळ्यानिमित्त उमरी येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष आ. प्रताप पाटील चिखलीकर तर प्रमुख आतिथी माजी मंत्री नवाब मलिक, जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर,




माजी सभापती शिरिष गोरठेकर, बँकचे संचालक कैलास गोरठेकर, माजी नगराध्यक्ष प्रविण सारडा, माजी आमदार मोहन हंबर्डे, सरचिटणीस डॉ. दिलीपराव धर्माधिकारी, माजी नगराध्यक्ष महमद रफीक, नागनाथराव घिसेवाड, सदाशिव पुपुलवाड, ऐजाज खान, राजू पाटीर ढगे, विष्णु पंडीत, गणेश गाढे, मोहसिन खान, आनदराव यल्लमगोडे, श्रीमती जोगदंड, सचिन नाईक, गणेश आन्नेमवाड, सुधाकर देशमुख, दत्तू रेड्डी, बालाजीराव जाधव, स्वप्नील इंगळे मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, यंदा आतिवृष्टीच्या काळामध्ये बळीराजाचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांसाठी आम्ही केंद्राची मदत मागत आहोत. उद्या केंद्रिय गृहमंत्री अमित शहा मुंबईला येत आहे. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी २९ तारखेला मुंबईला येणार आहेत या दोन्ही नेत्यांनी, तुम्ही पंचनामे करा आणि अहवाल पाठवुन द्या आम्ही आवश्यक ती मदत देऊ असे आश्वासन दिले. पिक कर्जाचे पुनर्गठन, शाळा महाविघालय परिक्षा शूल्काला माफी, रोजगार हमी योजनेच्या कामात शिथीलता, शेती पंपांची वीज जोडणी खंडित न करणे आदीची मदत मिळणार आहे. तर येथील जनतेनी गोरठेकर घराण्यावर प्रेम केले. सर्व सामान्य माणसाला केंद्र बिंदु मानुन त्यांनी काम केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा शिव छत्रपती, फुले, शाहू आंबेडकर, सावित्रीवाई फुलेंच्या विचारधारेने पुढे चालेला आहे. उमरीला आल्यानंतर मी शिवछत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला नतमस्तक झालो ते आपल्या सर्वांचे दैवत आहे. संत कवी दासगणू महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली कर्मभूमी असून कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर (पान ६ वर...)







### आता औरंगाबाद रेल्वे स्थानकाचे नाव छत्रपती संभाजीनगर

**मुंबई (प्रतिनिधी)–** औरंगाबाद रेल्वे स्थानकाचे नाव बदलून छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानक असे करण्यात आले आहे.

औरंगाबाद रेल्वे स्थानकाचे नाव बदलून छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानक असे करण्यात आले आहे. या स्थानकाचा नवीन स्थानक कोड सीपीएसएन असा असेल. त्यामुळे औरंगाबाद रेल्वे स्थानकास आता पुढे छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानक या नावाने ओळखले जाईल आणि स्थानकाचा कोड सीपीएसएन असा राहील.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमानतळावर स्वागत







**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे शनिवारी सकाळी येथील श्री गुरु गोविंदसिंघजी नांदेड विमानतळावर आगमन झाले असता त्यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आ. प्रताप पाटील चिखलीकर, आ. बालाजी कल्याणकर, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अपर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदिप गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर आदींनी त्यांचे स्वागत केले.

### विनोदी अभिनेते सतीश शाह यांचे निधन

**मुंबई (प्रतिनिधी)–** मैं हूं ना, जाने भी दो यारो सारख्या चित्रपटांसह अनेक भूमिकांमधून प्रेक्षकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणारे ज्येष्ठ विनोदी अभिनेते सतीश शहा यांचं मुंबईतील हिंदुजा रुणालयात शनिवारी निधन झाले आहे. किडनीच्या आजारामुळे ते त्रस्त होते. ७४ व्या वर्षी या अभिनेत्याने अखेरचा श्वास घेतला. चार दशकांहून अधिक काळ प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या या अभिनेत्याच्या जाण्याने भारतीय चित्रपट सृष्टी आणि दूरदर्शन क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण पर्व संपल्याची भावना व्यक्त होत आहे.

### खुर्चीवर माणसं नव्हे! माणसांवर खुर्च्या



**देगलूर** : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या देगलूरच्या सभेत जोरदार पाऊस पडल्याने उपस्थितांनी खुर्च्या डोक्यावर घेत पावसापासून संरक्षण केले. (छाया : सचिन डोंगळीकर)


### डॉक्टर आत्महत्या प्रकरण : संशयित आरोपी प्रशांत बनकरची पोलीस कोठडीत रवानगी

**सातारा (प्रतिनिधी)–** फलटण येथील डॉक्टर आत्महत्या प्रकरणात संशयित आरोपी प्रशांत बनकर याला कोर्टामध्ये हजर करण्यात आले होते. अतिरिक्त जिल्हा न्यायालय फलटण यांच्याकडून संशयित आरोपी प्रशांत बनकर याला चार दिवसांची कोठडी सुनावण्यात आली आहे. न्यायालयाच्या आदेशानं प्रशांत बनकर याला २८ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

## न्यायमूर्ती सूर्यकांत भारताचे पुढील सरन्यायाधीश?

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** देशाचे विद्यमान सरन्यायाधीश भूषण गवई यांनी सरन्यायाधीश हा पदभार स्वीकारल्यानंतर अवघ्या काही महिन्यातच निवृत्त होत आहेत. भूषण गवई २३ नोव्हेंबर, २०२५ रोजी सरन्यायाधीश पदातून निवृत्त होत आहेत. त्यामुळे भारताचे पुढील सरन्यायाधीश कोण असणार? असा प्रश्न सर्वांना पडला आहे. मात्र आता देशाचे पुढील सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती सूर्यकांत यांची निवड निश्चित मानली जात आहे.

सरन्यायाधीश भूषण गवई यांची नोव्हेंबरमध्ये निवृत्ती होणार असल्यामुळे केंद्र सरकारने नियमानुसार पुढील सरन्यायाधीशांची निवड प्रक्रिया सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर न्या. सूर्यकांत हे सर्वोच्च न्यायालयाचे नवीन सरन्यायाधीश होणार असल्याचे मानले जात आहे. न्या. सूर्यकांत यांना १६ महिन्यांचा (पान ६ वर...)



# बैनीची रक्षा करणारा भाऊ

वऱ्हाडी कथा

चांदन टिपूरं निळ्या काळ्या आभाळाच्या अंगअंगावर पडलं होतं. चंद्र अर्धगोलाकार रूप धारण करत होता. आकाश काळेभोर एखाद्या नांगरलेल्या शेताप्रमाणे भासत होतं. अन् चांदन्या म्हणजे जवारीचे दाने पेरल्यागत वाटत होते. रातकिळ्याची किर्र किर्र वातावरण भयावह करत होते. अधूनमधून बेडकांचा 'डरॉव ऽऽऽ डरॉव ऽऽऽ' असा आवाज येत होता. भटक्या कुत्ऱ्यांचा भूकेमुळे भेसूर असा आवाज त्या वातावरणात अधिकच भर घालत होता. रस्ते, गल्ल्या, बोळी निर्मनुष्य झाले होते.

बकुळा दामोदरच्या कुशीत वडाला वट-पोर्णिमेला धागा जसा गुंडाळावा तशी अगदी घट्ट बिलगून होती. तीचं रोमनरोम शहारत अन् पुलकित होत होतं. काळजात सौख्याचे अमृत झर्रर पा-झरत होते. गावात निरव शांतता पसरली होती. रातकिड्यांची किरकिर अधूनमधून ऐकू येत होती. बकूळाचे ओठ वावटळीत गवताचे पात थरथरावे तसे थरथरत कंपन पावत होते. अंगावर रोमांचित मदहोश करणारा काटा अगदी ताठरतेने उभा झाला होता. दोघाच्या घट्ट मिठीत वाऱ्याला पायबंद घातला गेला होता. दोघात सुतभराचे सुध्दा अंतर राहिले नव्हते. ते दोघही प्रणय सुखाच्या खोल खोल डोहात डुंबून तल्लीन होऊन मग्न नि एकरूप झाले होते. भाजी शिजवताना उतू येते तेंव्हा भगूल्यावर ज्या प्रमाणे झाकन ठेवावे त्याचप्रमाणे दामोदरने बकुळाच्या ओठावर अगदी अलगद ओठ ठेवले होते. टाकसळीगत चुंबनांचा वर्षाव सुरू झाला होता. दोघंही पिसाळले होते. बकूळेच्या काळजाची धडधड हार्मोनियमच्या सुरांसारखी जलद गतीने होत होती आणि तंबऱ्याची तार झनकारावी तशी झणकार दोघांत निर्माण झाली होती...आणि दोघंही संसार सुख घेण्यात रममाण, एककल्ली झाले होते. तेवढ्यात मध्यरात्री दाराची साखळी वाजली. दोघंही घाबरले. दोघांनी जलद-तेने नीट कपडे सावरले. बकुळाने काळेकुंतल केसांचा एकटक्की अंबळा बांधला. दोघांच्या सौख्य साखरदुधात मिठाच्या खळ्यासारखी तो दाराच्या साकळीचा कनकनाट अगदी भेसूर आवाज विघ्न ठरला होता.

बकुळा दार उघडायला गेली. दार उघडलं गेलं. दारात ऊभा होता भैरव. भैरव बकुळेला एकटक पाहत होता. तिचे थोडे केस विस्कटलेले होते. माथ्यावरलं कुकू मेनाला सोडूनं चवभवताल लगनात मळवट भरल्यासारखं पसरलं होतं. ओठ पांढरेफट्ट पडले होते. लुगळ्याचा पदर छातीवरूनं किंचितसा सरकलेला होता.चोळी तंग होती. ऊभार रेखीव व ठसठसीत वाटत होता. लुगळ गुडघ्यापर्यंत नेसलेले असल्याने चिळीच्या अंधुकश्या प्रकाशात भरीव वाटत होत्या. बकूळाची अंधार सावली भैरवच्या अंगावर पडली होती. भैरवची नजर कुतऱ्यागत तीच्या अंगअंगावरून बोटी बघावी तशी गर्रकन फिरली होती. बकूळा अंगपिंडान ठस्स भरीव होती. तिचा उभार लेणीगत रेखीव होता. चेहरा देखना, हसरा आणि कुणालाही भूल- चकवा पाडेल असा होता. गरिबीमुळे बकुळा दामोदरच्या झोळित लग्न होऊन पडली होती. भैरव पाटील हा गावातला मोठा जमीनदार. दामोदर हा भैरवकडे सालगडी म्हणून कामाला होता. दामोदर पडेल ते काम करत असे. मग शेतीतली असो वा घरातली. दामोदरच बकुळासोबत लग्न होऊनं अवघे सहाच महिने झाले होते. लग्न झाल्यावर दामोदर आणि बकूळा देवदर्शन आटोपून भैरव पाटलाच्या वाळ्यात दर्शनासाठी गेले होते. तेंव्हापासून बकुळा भैरव पाटलाच्या नजरेत बुबळावानी बसली अन् खुपली होती. भैरव सदैव विचार करीत असे. ह्या पाखराले कवा मुठीत धरतो म्हणून. पन भैरव दामोदरला जरा दचकून राहत असे कारणही तसच होतं. दामोदर अंगपिंडान एखाद्या लाल मातीतल्या पैलवानासारखा वाटत असे. लहानपणापासून तो कसरत करत असे आणि घरच्या कबऱ्या देशी गायीचं तांब्याभर दूध पेत असे. घरात दूध, दही, तूपाची गाडगे भरून राहत असे. दामोदर दिसायला गोरापान, ऊंचपूरा, पसरता माथा, आकड्याच्या मिशा, बलदंड शरीर पण स्वभावान अगदी साधाभोळा. कुठल्याही प्रकारचे छक्के पंजे व डावपेच त्याला कळत नसे. दामोदरन बायकोला आवाज देत म्हतलं. बकुळे कोन आलं व दारात. धाकले मालक हायेत.

अरे बापरे! देवाचे पाय माह्या झोपळीले लागले...असा पुटपुटत थो ऊठला. केस सावरतच दारात आला. मालक रामराम. दामोदर दोन्ही हात जोडून नी छातीवर हात धरूनं अंत्यत अदबीने, म्रपणे मान खाली घालून बोलला.

रामराम दामोदर.

ईकळे गरीबाच्या झोपळीत कस येनं केलं सरकार बापाईतल्याराती. आपण निरोप धाळ्ळा असता त मीच आलो असतो ना वाळ्यावर कामून बापा मी तुह्या घरी आलो त चालत नाही काय? बापा बापा कामून नाही चालत दौळनं...तुमचचं घर हाय हे सरकार. तुमचीच त देन हाय हे घर. काय काम होत सरकार. दामोदर खाली मान घालूनं हळूवार बोलला. घरात बलावशीन काय नायी. का अथिसाच दारात सांगू.

माफ करा सरकार. या घरात या. अय बकूळे पिळं टाक सरकारले बसाले अन पटकन गीलास धूवून पानी अन पान-सुपारी आनं. दामोदरचा हुकूम पाळत बकूळानं पटकन पिळ आनलं पिळ टाकतानी बकूळा खाली वाकली. भैरवची चोरटी, बेरकी अन बाजिंदी नजर बकूळेच्या छातीवरूनं भुर्रकन फिरली. बकूळा हुशार होती . तीन भैरवची लाळ गळतांना पाहिली होती.बकूळा कावरी बावरी झाली. तीनं पटकन पदर छातीवर ओढून धरला. बकूळा तशी हुशार होती. माणसाची चांगली आणि वाईट नजर ओळखत होती.

दामोदर जवार घेऊन तालुक्याले जा लागते तुले उद्या. भैरव बकुळाकडे बघत बोलला. जातोना सरकार. भैरव बकूळेकडे शिकारीगत एकटक लावून बघायला लागला होता. दामोदर साधामाणूस, पण थोडाफार शहाणा होता. दामोदर जरा खाकरूनं बोल्ला. बकुळे जाय रांधन घरात सरकारले चा ठुय. दुद जरा जास्त टाकजो अन् साखऱ्या जरा कमी. सरकारले फिक्काचा आवळते. बकूळानं मान हलवून होकार दिला अन रांधन घरात जाऊन बकुळाने चूल पेटवली. गंजूली ठुयली. पानी, चा पत्ती, गव-तीचा, साखऱ्या, दोळा, अदरक टाकलं. चाले गदका आला तस दुध टाकलं. चा चा वास घरभर पसरला. चा टुटलेल्या कानाच्या सिंगलावर चायनी धरून भरला गेला. बकूळेनं दोन कप शिगोर भरून आनले. बोट जयत होते. एक कप भैरव पुढे नेला. त्यानं पापन्या ऊचलूनं बकूळेकडे पाहिलं नंतर वाफाळत्या शिंगलाकडे पाहिलं आणि बकूळेचे बोट दामोदरच्या न कळत दाबले तशी बकूळा घाबरली आणि तीने शिंगल सोडला. चहाचे शिंतोडे बकूळेच्या लुगड्यावर आणि भैरवच्या धोतरावर ऊडाले. तसा दामोदर किंचाळला.

काय व बकूळे कशी व तू चा मातीत घातला. सरकारच धोतरही भरोलं. माह्या शिंगल दे सरकारले. मी जरा दुधाच भगून शिक्यावर ठेवून येतो बात. नाहीत बोक्या सुंहा करन रातच्यानी. असं खोटनाट बोलूनं बकुळा रांधन घरात पळाली. दामोदरनं चहा अर्धा अर्धा केला. दोघे पिले आणि भैरव दाराच्या चौकटीतूनं वळूनं पाहत बोलला. लवकर ये ऊद्या मंग दामोदर तुले जा लागनं तालुक्याले. दामोद-रनं होकार भरला. दामोदर रांधन घरात गेला. बकूळेनं भाकरी थापल्या होत्या तुरीच्या चिपळाच्या गोयाची भाजी केली दोघही अर्ध्याराती पोटभर जेवले आणि झोपी गेले.

बकुळा पायटच्या पाचच्या अजानला ऊठली. तीने सडा सारवन केलं. आंघोळ केली, तुळशीला पाणी वाहलं, दिवाबत्ती केली, देव न्हानले, चहा बनवून नवऱ्याला दिला. भाकरी थापल्या. न्याहारी दिली. संध्याकाय होईल म्हणून जादाची शिदोरी बांधूनं दिली. दामोदरनं जायची तयारी केली. जाताना बकूळेच्या गालाचे चुंबन घेतले. बकूळा लाजली. बकूळा दामोदरची पाठमोरी मूर्ती बघत अंगणात उभी होती.

दामोदरने मागे वळून पाहिले तर बकूळा त्यालाच न्याहाळत होती. दामोदर अण्णाभाऊचं गाण गुण-गुणत चालला होता. 'माझी मैना गावकडं राहिली, माझ्या जिवाची होते या काहिली...'भैरवची बायको कुंताबाई सग्यासोयऱ्याच्या लगनाला गेली होती. भैरवनं साऱ्या सालगड्यांना रजा दिली होती. फक्त एकच माणूस अन थो ही विश्वासातला माणूस बापूराव हा भैरव पाटलाच्या दिमकतीला वाड्यावर राहिला होता. भैरव बापूरावला बोलला. बापू एक काम करत गळ्या माह्यं.

सरकारचा हुकूम सर ऑखोपर. बोला ना सरकार काय करू कोळ्ळ्या ईहरित ऊळी मारू की ईव्यान गया कापून घेवू. अरे नाही रे बावा अस कायी नोको करू. तू फकस्त दामोदरच्या घरी जाय अन् त्याच्या बायकोले बलावूनं आनं. काय निरोप देवू सरकार. कायच्यासाठी बलावलं म्हनून. अरे भैताळ्या. त्वाली वैनीसाहेब लगनाले गेल्या ना चार रोज मंग मले भाकर टुकळा कोन करून घालन. माह्या घरूनं आनतो ना सरकार. गावरानं कोंबळ अन् जवारीच्या पाच सहा भाकरी. थो दामोदर मटन खात नाही ना त्याची बायको खात. मंग तीले कस बनवता येईनं मटन. थ्या परीस माह्या बायकोले आनतो सरकार. अरे! भैताळ बेलन्या तुले जे सांगल थे करनं. काहाले फुकटचे ऊंखंडे फुकतं गध्यासारखे.

भैरव रागारागात बोलला. बर सरकार तुम्ही म्हनसान तस करतो. बापूरावनं खजील होवूनं मान डोलावली. अन काठी घेऊन तडक तो दामोदरच्या घरी आला. काठीनं दाराची साखयी वाजवली. बकूळाला वाटले तीचा नवराच आला. ती हरकली अन् आनंदाने धावत येऊन तीने दार खोलले. बापूरावले दारात ऊभा पाहताच बकूळाचा चेहरा पडला. बकूळा नाराज होवूनं बापूरावला म्हणाली.

भावजी या ना घरात. बकूळेनं जल्मरीच्या ग्लासात पाणी दिलं. चुलीवर चा ठुयला. बापूराव चा पेला. बकूळा बापूरावच्या पुढे पाय दुमडून बसली. भावजी अजूनं हे कसे काय आले नाही हो. कवा येतीनं. दोन दिवसान येयन दामोदर. तालुक्याले गेल्यावर टायम लागनारचं. अव मायबाई हे त म्हनत होते. सयसंध्याकाय लोग येयन म्हनूनसन्या. बरं थे जावूद्या कस काय येनं केलं ईकळे. वयनी तुम्हाले भैरव पाटील सरकारनं वाड्यावर बलावलं. बकूळा भैरवच नाव ऐकताच भांबावली, घाबरली, टरकली...आणी तीची छाती ढोल बदळाव तशी बदडल्या जात होती. डोळ्यात भिती दाटून आली होती. जिभीले लकवा पडल्यागत बोलली. का...हा...ले..ब.. लावल..

सैपाकाले. कामून तेयची बायको कुठ गेली पासली पळाले. थ्या वैनीसाहेब गेल्या सोय-याच्या लगनाले. बाबूळगावले..चला पटकन तेयले भूक लागली असनं. बकूळाचे अंग नी अंग थरथर हरिणवानी कापत होत. आता काय कराव. गेली त अब्रू जाते अन नाही गेली त नव-याच काम. तीने काही वेळ विचार केला अन ऊठली. चांगभांग केला. घोयात ईवा टाकला. अन निंघाली बापूरावच्या मागे मागे.भैरव त्याच्या वाड्याच्या खिडकीतून बकूळेची चातका सारखी वाट बघत होता. त्याला दुरूनचं बकूळा दिसली आणी तो अंगोपांगी शहारला, मोहरला, प्रफुल्लित झाला. त्याच्या चेह-यावर चांदील दाटली.

बापूरावने बकूळेला रांधन घर दाखवल, पिठ, मीठ, तिखट, मसाल्याचे गाडगे डबूले दाखव-ले. बकूळेने विजेच्या गतीने सैपाक केला. हात धुतला आणि बापूरावला जाता जाता म्हणाली...

भावजी जातो म्या घरी. दवळीत भाकरी बनवून ठेवल्या अन दवळी शिक्यावर ठुयली हायं. आलूवांग्याची भाजी गंजात शिजवून ठुयली. जातो मंग मी आता. अस बोलत बकूळा आनंदीत होवून वाड्याबाहेर पावल टाकत चालली होती. हरनाने वाघाच्या तावडीतूनं सुटाव तस तीला वाटत होते. तीचे पावल मोठमोठे नी भरभर पडत होती. तीला आनंद अपार झाला होता. तेवढ्यात भैरवचा आवाज दुमदुमला... बकूळे थांब. बकूळाच्या आनंदावर क्षणात विरजन पडलं. तिचे पाय थबकले, पोटऱ्यात कंप भरला, काळजात जी मघाशी सतार वाजत होती तीच रूप ढोलानं घेतलं होतं. तीने डोक्यावर पदर घेत म्हतलं. काय सरकार? खिचळी बनव अन हे कोंबड आनल थ्याले छिलूनं साजरी भाजी बनव मले आवळ-ते. बापू तेवढ्यात खाकरत बोल्ला सरकार तीले कोंबड कापता येत नाही ना शिजवता येत. म ह्या घरूनं आनू काय बनवूनं. नाही बापू मले अथिसाच बनवून पाह्यजे. असा दरडावत फनका-यानं भैरव बोलला. वैनी कायजी करू नोका मी बात देतो कोंबड कापून. तुम्ही तुरीची दाय टाका चुल्यावर शिजाले. बकूळेनं चुलीवर पानी ठेवलं. तुरीची दाळ निसली. आंदन आल्यावर दाळ टाकली. गदका आल्यावर तांदूळ निसूनं टाकले. खिचडी चुलीवरची ऊल्ह्यावर आली. बापूनं कोंबड्याचं मानगुट धरलं चर्रकन सुरीनं मुंडक धळा वेगळं केलं. रक्ताची चिरकांडी ऊडाली. कोंबड फडफडत थंडगार झाल. अंगावरचे पंख ओरबाडून काढण्यात आले. खरपावर सुरा पाजवण्यात आला. लाकडाच्या गोल बुंद्यावर कोंबड्याचे तुकडे करण्यात आले. आतडीपितडे बाजूला सारन्यात आले. गरम पान्याने धुवूनं हयद मिठाच्या पान्यात भगून्यात सोडण्यात आले. कोंबड शिजलं. तिखट, मिठ, आरात भाजलेला कांदा नी खोबर मसाल्याची फोडणी देण्यात आली. भाजी तयार झाली. बकूळा आता पुन्हा हरकली. बापूराव बकूळाला बोलला. वैनी जा आता घरी. लय रात झाली. मी येवू काय सोळाले घरी. नाही नाही भावजी मी जातो. एकली. आपलच गाव हाय. काहाच भेव हाय.जातो एकलीचं. कुतरे गीतरे पायजा देसान अंधारात पाय एखांद्या कुतऱ्याच्या आंगावर....बराबर जा.

बापूराव लय साजरा माणूस आहे. आपल्याला खुप मदत केली. धनी दामोदररावचा खरा मैतर हाय. अडीअडचणीले, सुखदूखात धावूनं येतो. अस मनात म्हनत चाल्ली. तेंव्हाच वाघाने डरकाडी फोडाव तसा भैरव पुन्हा ओरडला. बकूळे!... सैपाक केला खरी...पन वाहळून कोन देईनं. बकूळा आता पार घायबरली. भैरवच्या मनात कायबेर हाय. हे तिनं हेरलं. हा डाव साधन्याचा प्रयत्न करेल. पन ह्या आडदंड मनसापुळे माह्यासारख्या पिटूकल्या बाईचा टिकाव लागन काय? ह्या ईचारात ती गुंग झाली होती. सरकार मी देतो ना वाहळून रातमय झाली. जावूद्या त्या बाईले अन् पायटीच ऊठून सळा सारवन करा लागते बिचारीले. बापूराव बोलला. बकूळा डबलूनं रांधन घरात आली. तीला तो वाडा नकोसा झाला होता. चौभवताल तीने नजर फिरवली. वाडा चिरेबंदी, मजबूत दार. वाड्याची फिताळ आ वासून ऊभी तिला खाऊन टाकेल की काय अशी बिभत्स दिसत होती. तीने तासकी घेतली वाढायला सुरवात केली. तितक्यात भैरव दरडावला. बापू मले मोहाची दारू तांब्याभर घेवून ये बर पंचायाकळूनं. बापून लोटा घेतला अन् सरळ निंघाला. आता बकूळेचा त्या चिरेबंदी वाळ्यातला एकमेव सहारा थो ही निघून गेला होता. बकूळा थरथरत होती. वाळ्यात तीचा जीव घुटमळत होता. भैरव बकूळाजवळ आला.

बकूळे माह्य एक काम करशीन काय?

कोन्च सरकार. बकूळाचे ओठ थरथरत होते. अंगाला थंडीसारख कापर भरलं होतं.

आजच्यारातीमाह्यीहोशीनकाय?तुलेलागन थे देतो..फकस्त...बकूळानं डाव ओळखला. मटनाची गरम तासकी भैरवच्या तोंडावर क्षणात भिरकावली. भैरव मटनान माखला. तो आता पिसायल्या कुत्र्यावानी झाला होता. त्यान अंदरून दाराचा कोंडा लावला, कुलूप बंद करून जोरजोरात राकेसा सारखा हसायला लागला. बकूळा मलूल झाली. ती भैरव ला दयायाचना करत होती.

सरकार अस नोका करू. तुम्ही अस करसान त मी तोंड दाखवाच्या लायकीची ना राह्यनं. मले एकत मरा लागन नाही त मारा लागनं.

अस म्हनत तीने घोयात असलेला ईया काढूनं वार केला. पण त्याने वार हुकवत तीचा हात धरत जवळ ओढल. तीच्या गळ्यावरूनं , अंगावरून थो हात फिरवाले लागला. ती भैरवला ईज्जतीची भीक मागत होती. पण तो ऐकत नव्हता. तो आता मनसुबा पुरा करनार तितक्यात बापू आला. बकूळाचा आवाज दाराच्या आडून ऐकत होता. त्याने क्षणा-चाही विलंब न करता एका लाथेत कवाड पाडलं आणि कंबरेची पाजवलेली कु-हाड भैरवच्या मस्तकात हानली. एका फटक्यात भैरवची कवटी फुटली. रक्तबंबाळ होऊन भैरव तडफडत निपचित पडला. बकूळा घाबरली. आता काही खरं नाही भावजी आपलं. आपल्याले फाशी जा लागनं.

भेदरलेल्या स्वरात बकूळा बोलली.

वयनी कायजी करू नोका. मी सार ठिक करतो. तुम्ही घाबरू नोका. हे गोठ कानोकान कोनाले मालूम नाही झाली पाह्यजे दामोदरले ही नाही. तुम्ही आता घरी जा. बकूळेनं मान हालवली अन थे भयभीत होत घरच्या दिशेनं निघाली.

बापू ताळकन ऊठला. संग दोन पो-ते घेवूनं जंगलात गेला. दोन कोल्हे त्याने पोत्यात पकडून वाड्यात आणले. ज्या खोलीत भैरवले मारलं थ्या खोलीत दोन्ही कोल्हे सोडले. दार बाहेरून लावलं. पोते जाळून खाक करून टाकले. कु-हाड विहरीत टाकली...अन् रातभर दाराच्या बाहेर पहारा करून थो ऊभा होता. मध्यरात्री दाराच्या फटीतून त्याने आत पाहले तर दोन्ही कोल्हे भैरवचा लचका तोडत त्याला खात हो-ते. रातभ-यात दोन्ही कोल्हे भैरवला खा-वून सठ्ठ फुगले होते. संपूर्ण मांस खाऊन हाडांचा सांगाडा ऊरला होता. पहाट होताच बापूने खोटीनाटी अंगतिडकीने बोंब ठोकली. धाकट्या सरकारले कोल्ह्यान मारलं, फाडलं, खाल्ल. अवघ गाव जमा झालं. सार गाव पाहत होत की, कोल्हे भैरवला खात आहेत. बकूळा मात्र अंगावर वाकळ घेऊनं भयभीत होऊन तीच्या घरात रडत होती. तीच्या अंगात ताप भरला होता. दिस,मास, साल लोटले अन् सार काही आलबेल झालं. असा होता बापूराव ज्यांने भावाच कर्तव्य निभावल आणि दामोदरचा खरा मित्र ठरला होता.

**–सु. पुं. अढाऊकर**
अकोला
मो. ९७६९२०२५९७

## हरवलाय माणूस

माणसाच्या गर्दीत माणूस
आता माणुसकीला विसरलाय
पैशाच्या जोरावर उडतो आता
मात्र अहंकारात चडलाय
बांधून ठेवली मोठी इमारत
स्टाईल देखील लावली घराला
हम दो हमारी दो म्हणून
आईला पाठवले वृद्धाश्रमाला
विज्ञानाच्या दुनियेत
त्याने घेतली गगन भरारी
माणुसकीचं नातं मात्र
विसरून गेला सारी
शेती करायची त्याला
आज बघ ना लाज वाटते
भुई वर वाढलेल्याला
बघ ना पैश्याची खाज सुटतेय
घराचं घरपण गेलं
गेली आता संस्कृती
इतकं सारं कमावलं त्यानं
विसरून गेला नातीगोती
आईचं झालं मम्मा
पप्पा बाबा च झालं
आजी आजोबा दिसे ना
त्यांना मात्र वृद्धाश्रमात धाडल
हरवली सारी
आपुलकीची नाती
प्रेम दिसे ना खरे इथे
दिसे ना कुठे सांगाती

**प्रतीक्षा गजानन मांडवकर**
(स्वप्न डोळ्यातले)
यवतमाळ
मो. ८३०८६८४८६५

# विनोदाचे अचूक टायमिंग साधणारा सर्वांचा लाडका 'लक्ष्या'

जवळपास दोन-अडीच दशके मराठी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा लक्ष्या अर्थात लक्ष्मीकांत बेर्डे याचा आज जन्मदिन. लक्ष्या म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीला पडलेले एक विनोदी स्वप्न. लक्ष्या या नावाशिवाय मराठी चित्रपटाचा इतिहास लिहिलाच जाऊ शकत नाही. लक्ष्मीकांत बेर्डे या त्याच्या पडद्यावरील नावापेक्षा लक्ष्या या नावानेच तो अधिक ओळखला जातो, कारण हे नाव त्याला प्रेक्षकांनी दिले आहे. लक्ष्या हा मराठी प्रेक्षकांना आपल्यातीलच एक वाटायचा म्हणूनच दहा वर्षाच्या मुलापासून ऐंशी वर्षांच्या आजोबांपर्यंत सर्वांनी लक्ष्यावर अतोनात प्रेम केले. जवळपास दोन अडीच दशके आपल्या सहज - सुंदर, विनोदी अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात घर करणाऱ्या लक्ष्याचा जन्म सत्तर वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे २६ ऑक्टोबर १९५४ रोजी झाला.

लहानपणापासून अभिनयाची आवड असलेल्या लक्ष्याने आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात टुरटुर या नाटकाद्वारे केली. टुरटुर हे त्याचे पहिलेच नाटक कमालीचे हिट झाले आणि या नाटकातील त्याची भूमिकाही प्रेक्षकांना आवडली. त्यानंतर 'शांतेचं कार्ट चालू आहे', 'बिघडले स्वर्गाचे दार' या नाटकातून त्याने केलेल्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना भावल्या. ही नाटके देखील हिट झाली. लागोपाठच्या नाटकात विनोदी भूमिका करून लक्ष्या नाट्य सृष्टीत आघाडीचा विनोदी अभिनेता म्हणून पुढे येऊ लागला. याच भूमिकांच्या जोरावर त्याला मराठी चित्रपटातही संधी मिळाल्या. अर्थात नाटकाप्रमाणे इथेही त्याला विनोदी भूमिकाच मिळाल्या त्यानेही या भूमिकांचे सोने करत त्याला मिळालेल्या विनोदी भूमिकांना न्याय दिला. त्याच्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना खूप आवडल्या. त्याची लोकप्रियता वाढू लागली. लक्ष्या या नावाने आबालवृद्धांमध्ये त्याची लोकप्रियता पसरली. त्याचे चित्रपट प्रचंड यशस्वी झाले. त्याची जोडी जमली ती महेश कोठारे यांच्यासोबत. महेश कोठारेंचा चित्रपट आणि लक्ष्या नाही असे सहसा घडलेच नाही. कारण महेश कोठारे आणि लक्ष्या ही जोडी म्हणजे यशाची खात्री अशी ओळखच बनली. या दोघांचा चित्रपट म्हणजे मनोरंजनाची शंभर टक्के हमी. या दोघांनी एकत्रित भूमिका केलेले धूमधडाका, धडाकेबाज, थरथराट, झपाटलेला असे कितीतरी चित्रपट तिकीटबारीवर यशस्वी झाले. यशस्वीच नाही तर या चित्रपटांना प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. लक्ष्याने सचिन पिळगावकर यांच्या सोबत केलेला अशी ही बनवा बनवी हा चित्रपट देखील हिट झाला. लक्ष्या आणि अशोक सराफ या दोघांचीही जोडी जमली. या दोघांनी एकत्रित अनेक चित्रपट केले आणि ते यशस्वीही झाले. ८० आणि ९० च्या दशकात लक्ष्या आणि अशोक सराफ या जोडीने मराठी चित्रपट सृष्टीत अक्षरशः धुमाकूळ घातला. ही जोडी म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीतील राम लक्ष्मणाची जोडी. या दोन्ही कलाकारांचे ट्युनिंग अतिशय चांगले जमले होते. या दोघानी मराठी मनांचे मनोरंजन करीत अनेकांना आयुष्यातील तणाव, दुःख विसरायला लावून आनंदाचे कारंजे फुलविले.

मराठीत लोकप्रियतेच्या शिखरा-वर असताना लक्ष्याला हिंदी चित्रपट सृष्टीतून चांगल्या ऑफर येऊ लागल्या. त्यातील काही ऑफर त्याने स्वीकारल्या. राजश्री प्रॉडक्शन्सच्या मैने प्यार किया या चित्रपटात त्याला सलमान खानच्या मित्राची भूमिका मिळाली ती त्याने छान निभावली. याशिवाय अनेक हिंदी चित्रपटात त्याने भूमिका केल्या मात्र त्याच्या अभिनयाचा कस लागेल अशा भूमिका त्याला हिंदीत मिळाल्या नाहीत त्या त्याला मिळाल्या मराठीतच. पु.



ल. देशपांडे यांनी लिहिलेल्या एक होता विदूषक या जब्बार पटेल यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटात मुख्य भूमिका निभावली ती लक्ष्याने. या चित्रपटात त्याने केलेल्या गंभीर भूमिकेने त्याच्या अभिनय क्षमतेवर शिक्कामोर्तब केले. हा चित्रपट तिकीट बारीवर अपयशी ठरला तरी त्यातील त्याच्या गंभीर भूमिकेने त्याला अनेक पुरस्कार मिळवून दिले. लक्ष्याने विनोदी भूमिका अधिक केल्या आणि त्या यशस्वीही झाल्या म्हणून विनोदी अभिनेता असे त्याचे वर्णन करणे हा त्याच्यावर अन्याय ठरेल. गंभीर भूमिकाही उत्तम प्रकारे करू शकतो हे लक्ष्याने एक होता विदूषक तसेच लेले विरुद्ध लेले आणि सर आले धावून या नाटकातून दाखवून दिले. आयुष्यभर प्रेक्षकांना हसव-णारा हा कलाकार १६ डिसेंबर २००४ रोजी प्रेक्षकांना दुःखाच्या सागरात बुडवून काळाच्या पडद्याआड गेला. विनोदाचा अचूक टायमिंग साधणारा, अभिनयाची दैवी देणगी लाभलेल्या सर्वांच्या लाडक्या हरहुन्नरी लक्ष्याला जन्मदिनी विनम्र अभिवादन!


**–श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# ग्रंथ हेच खरे सोबती...

खरी साथ किंवा सहवास ही ज्ञान आणि अध्ययन असलेल्या ग्रंथांमध्येच असते. म्हणजेच, पुस्तके, ग्रंथ आणि शिक्षण हेच आपले खरे मित्र आणि सोबती असतात, जे आपल्याला जीवनात मार्गदर्शन करतात, शिकवतात आणि समज वाढवतात. आपल्याला विचार करण्यास प्रवृत्त करतात आणि आयुष्याला अधिक अर्थपूर्ण बनवतात. खरी साथ, सहवास म्हणजे आपल्याला ज्ञान, चिंतन आणि अंतर्मुखता देणाऱ्या गोष्टींमध्ये असते. कारण माणसाची साथ कधी तुटू शकते, परंतु ग्रंथ, शास्त्र आणि अध्ययन ही अशी मैत्री आहे जी कायम टिकते, मार्गदर्शन करते आणि आत्मा समृद्ध करते.

पुस्तके, ग्रंथ आणि शिक्षण ही आपले खरे मित्र आणि सोबती आहेत, कारण या माध्यमांमुळे आपले ज्ञान वाढते, नवीन गोष्टी शिकता येतात, विचारशक्ती विकसित होते आणि जगाबद्दलची समज वाढते. शिक्षण आपल्याला चांगली दिशा दाखवते आणि जीवनात यशस्वी होण्यासाठी मदत करते. पुस्तके आणि ग्रंथ हे आपले खरे मित्र असल्याने, त्यांच्याशी मैत्री ठेवणे आणि त्यांचा योग्य वापर करणे खूप महत्त्वाचे आहे. पुस्तके आपल्याला नवीन जग दाखवतात, कल्पनाशक्ती वाढवतात. ग्रंथ आपल्याला परंपरेचा, संस्कृतीचा आणि शहाणपणाचा खजिना देतात. शिक्षण आयुष्याला योग्य दिशा देतात आणि व्यक्तिमत्त्व घडवते. हे तीनही मित्र आपल्याबरोबर कुठेही प्रवास करतात, पण त्यांची किंमत अमूल्य असते.

पुस्तक आणि ग्रंथ हे फक्त ज्ञानसंपादनाचे साधन नसून ते जीवनाला योग्य दिशा दाखवतात. वाचनामुळे आपले विचार समृद्ध होतात, दृष्टिकोन व्यापक होतो आणि चांगल्या वाईटाचे भान निर्माण होते. चांगल्या ग्रंथांमधून आपल्याला नैतिकता,



जीवनमूल्ये शिकायला मिळते. वाचनामुळे विचारसरणी मजबूत होते, आत्मविश्वास वाढतो आणि निर्णयक्षमता सुधारते. महान व्यक्तींच्या जीवनचरित्रातून आपण प्रेरणा घेतो व आपल्या आयुष्याला योग्य दिशा देऊ शकतो. पुस्तकांमुळे मन:शांती लाभते आणि मानसिक समृद्धी वाढते.

ग्रंथांमधून आपल्याला काळाच्या पलीकडच्या व्यक्तींचे विचार, अनुभव आणि ज्ञान भेटते. चांगल्या पुस्तकांच्या सहवासा-मुळे आपली विचारसरणी घडते. आपण ज्या लोकांना प्रत्यक्ष भेटू शकत नाही, त्यांच्या लेखनातून आपण त्यांच्यासोबत संवाद साधतो. यामुळे दृष्टिकोन विस्तारतो, मन समृद्ध होतं, आणि जीवनाला दिशा मिळते. त्यातून आपल्याला ज्ञान, प्रज्ञा, आणि जीवनमूल्ये मिळतात. त्यांच्याशी मैत्री ठेवणे म्हणजे त्यांचा योग्य वापर करणे, म्हणजेच त्यांचा योग्य प्रकारे अभ्यास, समज, आणि उपयोग करणे असे केल्याने आपली बुद्धी विकसित होते, विचारशक्ती वाढते, आणि जीवनात अधिक यशस्वी होण्याची क्षमता निर्माण होते. ग्रंथांशी मैत्री राखणे ही आपली जीवनदृष्टी वर्धिष्णू करणारी आणि आपला विकास करणारी प्रक्रिया आहे.

**–श्रीकांत संभाजी मगर**
नांदेड.
मो. ९६८९११७१६९

## योग्य कर्म करा..

शंकेविन भक्ती । स्वार्थाविन भक्ती ।
जगण्यास शक्ती । नित्य देई ।।

युद्ध नको म्हणा । प्रेमवीर बना ।
काढू नका फना । सर्पासम ।।

विकार जाळावे । व्यसन त्यागावे ।
स्वच्छंदी जगावे । जिवनात ।।

सर्वकाही धन । म्हणणारे जन ।
नेतील वसन । तरी कुठे? ।।

नाम फक्त स्मरा । योग्य कर्म करा ।
देव आहे खरा । अविनाशी ।।

शेतात राबतो । रात्रीला जागतो ।
सर्वांना पाहतो । देव माझा ।।

निसर्ग देवता । जगावे बघता ।
हसता बोलता । मृत्यू येण्या ।।

नको जर व्याधी । झाडे लावा आधी ।
कोणी अपराधी । होऊ नका ।।

अजु होतो नत । तयांना सतत ।
नित्य कसरत । ज्यांच्या हाती ।।

**–अजय रमेश चव्हाण,**
तरनोळी ता.दारव्हा,
जि.यवतमाळ
मो. ८८०५८३६२०७

## थोडक्यात...

### ३ नोव्हेंबर रोजी लोकशाही दिनाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** सामान्य जनतेच्या तक्रारी, अडचणी ऐकून घेऊन त्या सोडविण्यासाठी राज्य शासनाच्यावतीने प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन साजरा करण्यात येतो. लोकशाही दिन सोमवार ३ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १ ते ३ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन येथे आयोजित केला आहे.

या दिवशी महसूल, गृह, ग्रामविकास, पाटबंधारे, बांधकाम, परिवहन, सहकार, कृषि विभाग व पाणी पुरवठा समन्वय अधिकारी इत्यादी जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी व ज्या कार्यालयाचे लोकशाही दिनात प्रलंबीत प्रकरणे आहेत असे अधिकारी बचत भवन जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात उपस्थित राहतील. सकाळी १२ वाजेपासून निवेदनाची नोंदणी सुरु होणार आहे. लोकशाही दिनाच्या दिवशी प्राप्त होणाऱ्या जनतेच्या तक्रारी, अडचणी एकत्रीतरीत्या समजावून घेऊन त्या शक्य तितक्या लवकर सोडविण्यात येतील, असे निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी कळविले आहे.

### शटरचे कुलूप तोडून साहित्य लंपास

**उमरी (प्रतिनिधी)–** शहराच्या मध्यवर्ती भागातील मच्छी गल्लीतील अब्दुल रहीम यांच्या नांदेड दुकानाचे शटरचे कुलुप तोडून अज्ञात चोरट्यांनी दुकानातील आठ एलईडी, दोन मिक्सर व इतर साहित्य असा एकूण एक लाख रूपयाचा ऐवज चोरून नेला आहे. सदरची घटना शुक्रवारी रात्री घडली. या प्रकरणी उमरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील दोन अज्ञात आरोपी सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहेत. सदर घटनास्थळाचा पंचनामा बिट जमादार कदम यांनी केला आहे.

# उमरी, धर्माबादमध्ये स्वबळावर लढू

## आ. बालाजी कल्याणकर यांची माहिती



**नांदेड (प्रतिनिधी)–** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जिंकण्यासाठी ताकतीने कामाला लागा अशा सूचना शिवसैनिकांना देतानाच धर्माबाद आणि उमरी नगर पालिकेच्या निवडणूक शिवसेना स्वबळावर लढण्याची आमची तयारी असल्याचा एल्गार शिवसेनेचे नायगाव विधानसभा मतदारसंघाचे पक्ष निरीक्षक तथा नांदेड उत्तर विधानसभा मतदारांच्या आ. कल्याणकर यांनी पुकारला आहे.

धर्माबाद आणि उमरी येथील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तयारीच्या अनुषंगाने नायगाव येथे इच्छुक उमेदवारांच्या आ. कल्याणकर यांनी मुलाखती घेतल्या. यावेळी उपस्थित शिवसैनिकांशी त्यांनी संवाद साधला. नगरपालिका, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेची तयारी शिवसेनेकडून जोरदारपणे सुरू असून नायगाव विधानसभा मतदारसंघातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढण्यासाठी इच्छुक असणाऱ्यांच्या मुलाखती आज पार पडल्या.

यावेळी आ. बालाजीराव कल्याणकर यांच्यासह जिल्हाप्रमुख गंगाधर बडूरे, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाप्रमुख मंगेश कदम, महिला जिल्हाप्रमुख अपर्णा नेरलकर, तालुका प्रमुख आकाश रेड्डी, सुभाष येरेवार, उपजिल्हाप्रमुख प्रल्हाद पिंपळे, ज्ञानेश्वर बेलेकर, शिवाजी पन्नासे, भानुदास पाटील, शिवाजी पवार, बालाजी शिंदे, अनिल कमलाकर आदींची यावेळी उपस्थिती होती.

यावेळी उपस्थित शिवसैनिक आणि पदाधिकाऱ्यांशी संवाद साधताना आ. कल्याणकर म्हणाले की, तत्कालीन मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांनी केलेली विकासाची कामे ही खऱ्या अर्थाने महाराष्ट्राच्या विकासाचा चेहरा ठरलेली आहेत. अशा परिस्थितीत ग्रामीण महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी शिवसेनेच्या हाती सत्ता देणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघांचा कायापालट झाला त्या पद्धतीने आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांचा कायापालट करण्यासाठी माजी मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पार पडणाऱ्या निवडणुकांमध्ये जनता शिवसेनेच्या पाठीशी भक्कमपणे उभी राहील यासाठी पदाधिकाऱ्यांनी, शिवसैनिकांनी कामाला लागावे. हेवेदावे बाजूला सारावेत आणि पक्षाच्या बळकटीसाठी प्रामाणिकपणे कामाला लागून जिल्ह्यात शिवसेना नंबर एकच पक्ष म्हणून पुढे आणावे. नगरपालिका, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेवर शिवसेनेचा भगवा फडकवा अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या आहेत. शिवसेनेची उमेदवारी मिळावी यासाठी इच्छुक महिला व पुरुष उमेदवारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# भाजपा नांदेड जिल्ह्यात सर्वात महत्वाचा व मोठा पक्ष राहणार आहे -खा. अशोकराव चव्हाण



**लोहा (प्रतिनिधी)–** भारतीय जनता पक्ष हा नांदेड जिल्ह्यात सर्वात महत्वाचा व मोठा पक्ष राहणार आहे. तेव्हा भाजपाला साथ द्या, असे प्रतिपादन माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी लोहा येथे भाजपा कार्यकर्त्यांचा संवाद मेळावा व भाजपाचे लोहा शहर मंडळ अध्यक्ष यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या उद्घाटनाप्रसंगी केले.

दि.२४ ऑक्टोबर रोजी लोहा शहरात भारतीय जनता पार्टीचा कार्यकर्ता संवाद मेळावा व भारतीय जनता पार्टी चे लोहा शहर मंडळ अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक व प्रमुख म्हणून राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभेचे खा. अशोकराव चव्हाण होते. तसेच प्रमुख उपस्थिती भाजपाचे नांदेड जिल्हा महानगराध्यक्ष माजी आ. अमर राजूरकर, भाजपाचे माजी प्रदेश प्रवक्ते एकनाथ पवार, लोहा माजी उपनगराध्यक्ष शरद पवार, माजी जि.प. सदस्य चंद्रसेन पाटील, बबनराव निर्मले, देविदास महाराज गिते, केरबा बिडवई, विजय धोंडगे, डॉ.सुनिल धोंडगे, दमकोंडवार, शेख, नागनाथ चुडावकर, पुंडलीकराव पाटील बोरगावकर, डी.एन. कांबळे, भीमराव मुसळे, गंगाप्रसाद यन्नावार, बजरंग यादव यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना खा. चव्हाण म्हणाले की, लोहा -कंधार मध्ये यापूर्वी एवढी एकजुट कधीही नव्हती. ती आज झाली आहे. आता येथील व्यासपीठावरील मंडळी एकदिलाने काम करीत आहे, याचा मला आनंद असल्याचे ते म्हणाले.

या कार्यक्रमाला लोहा, कंधार तालुक्यातील भाजप पदाधिकारी, कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# नगरपंचायत असूनही नायगावचा विकास ठप्प; मूलभूत सुविधांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

**नायगाव (प्रतिनिधी)–** येथे नगरपंचायत अस्तित्वात असूनही शहराचा विकास ठप्प झाल्याची स्थिती निर्माण झाली आहे. रस्ते, नाले, स्वच्छता, वाहतूक व्यवस्थापन अशा मूलभूत सोयी-सुविधांकडे नायगाव नगर पंचायतीचे साफ दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

शहरातील मुख्य बाजारपेठ, बसस्थानक परिसर, शिवाजी चौक, हेडगेवार चौक, शेळगाव रोड ते नगरपंचायत कार्यालय या मार्गावर मोठ्या प्रमाणावर हातगाडे, पानटपरी, किरकोळ दुकानवाल्यांचे अतिक्रमण झाले आहे. रस्त्यावर बेकायदेशीर टिनशेडचे बांधकाम, हातगाडे आणि अनियंत्रित वाहतूक यामुळे सतत कोंडी निर्माण होत असल्याने पादचाऱ्यांना चालता येत नाही. शालेय वेळेत व आठवडी बाजारात तर वाहतुकीचा बोजवारा उडतो.

नगरपंचायतीच्या दुर्लक्षामुळे नागरिक त्रस्त झाले असून प्रशासनाच्या आशीर्वादानेच हे अतिक्रमण वाढत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. कर वसूल केला जातो, पण सुविधा नाहीत, अशी खंत स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली. तसेच कुणी आवाज उठविण्याची हिम्मत केले तर त्यांच्यावर दबाव तंत्राचा वापर केला जातो अशी चर्चा सर्वसामान्य नागरिकांतून होत आहे.

नायगावसारख्या वाढत्या शहरात नियोजनबद्ध विकास आवश्यक असताना, नगरपंचायत अधिकारी आणि लोकप्रतिनिधींच्या निष्क्रियतेमुळे शहराचे सौंदर्य आणि शिस्त धोक्यात आल्याचे दिसून येते. तातडीने कारवाई करून रस्ते मोकळे करावेत आणि विकासकामांना गती द्यावी, अशी मागणी सर्व सामान्य नागरिकांतून जोर धरत आहे.

# बावलगावात चिखल, अंधार आणि उद्धवस्त रस्ते

**बिलोली (प्रतिनिधी)–** बिलोली तालुक्यातील बावलगावची सध्याची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. गावातील मुख्य रस्ता चिखलाने भरलेला असून अनेक ठिकाणी पाणी साचलेले आहे. जल जीवन मिशन अंतर्गत तीन वर्षांपूर्वी पाईपलाईन टाकण्यासाठी रस्त्यांचे खोदकाम झाले, मात्र ते काम आजही अर्धवटच राहिले आहे. हे काम का थांबले आणि जबाबदार कोण याचे उत्तर ग्रामस्थांना अजूनही मिळालेले नाही.

बावलगावातील शेतकऱ्यांची पण अवस्था अधिकच वाईट आहे. शेतात जाण्यासाठी रस्तेच नाहीत. शिवरस्ते व पांदनरस्ते पूर्णपणे खराब झाले असून त्यांची दुरुस्ती करण्याकडे कोणीही लक्ष देत नाही. यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे आणि ढगफुटीमुळे बावलगाव परिसरातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान झाले. तरीसुद्धा या गावात आमदारांनी भेट दिलेली नाही. ग्रामस्थ विचारतात, आमदारांना मोठ्या गावात जायला वेळ असतो, पण आमच्यासारख्या लहान गावांकडे त्यांचं लक्ष नाही का? आमचं मत कमी महत्त्वाचं आहे का, पण गावातील चिखल, अंधार आणि उद्धवस्त रस्त्यांमुळे आम्हाला रोज त्रास सहन करावा लागतो. गावाच्या मध्यभागातून जाणारा मुख्य



रस्ता चिखलमय झाला असून, याकडे ग्रामपंचायत सरपंच, ग्रांमसेवक, उपसरपंच व सदस्य, नागरिकांच्या मागण्यांकडे कोणीच लक्ष देत नाही. आम्ही कोणावरही टीका करत नाही पण विरोधक शांत आहेत आणि सत्ताधारीही मौन बाळगून आहेत. दिवाळीच्या काळात गाव प्रकाशमय असावा अशी अपेक्षा असते, मात्र काही घरांसमोर अंधार कायम राहिला. विशेष म्हणजे एका विधवा महिलेच्या घरासमोरचा खांब अंधारात होता. त्या महिलेने सांगितल्यानंतरच बल्ब लावण्यात आला. मग प्रश्न असा अगोदर का लावला नाही? असा संताप ग्रामस्थांमध्ये आहे. ग्रामस्थांचा आरोप आहे की, आमदार जितेश अंतापूरकर यांनी बावलगाव या गावाकडे पूर्ण दुर्लक्ष केले आहे. रस्त्याच्या व पायाभूत सुविधांच्या बाबतीत ग्रामस्थांनी अधिकारी आणि मंत्रालयापर्यंत निवेदनं दिली, तरीही कोणत्याही विभागाने लक्ष दिलं नाही. मतदानाच्या वेळी मत मागायला येतात, पण निवडून आल्यावर गाव विसरतात, असा नागरिकांचा रोष आहे. आता गावकऱ्यांनी ठाम मागणी केली आहे की, या सर्व समस्यांकडे आमदारांचे वरिष्ठ नेते, माजी मुख्यमंत्री व विद्यमान राज्यसभा खा. अशोकराव चव्हाण यांनी तरी लक्ष द्यावे. बावलगावचे प्रश्न सोडवले नाहीत, तर ग्रामस्थ आंदोलनाचा मार्ग स्वीकारतील आणि पुढील निवडणुकीत मतपेटीतून उत्तर देतील, असा इशारा त्यांनी दिला आहे.

# २७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्याच्या सूचना

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्यात २७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. यावर्षी 'दक्षता- आपली सामायिक जबाबदारी' ही संकल्पना निश्चित करण्यात आली आहे. २७ ऑक्टोंबर रोजी सकाळी ११ वा. भ्रष्टाचार निर्मुलनाच्या प्रतिज्ञेने कार्यक्रमाचा प्रारंभ करावा. सदर प्रतिज्ञा विभाग व कार्यालय प्रमुख किंवा जेष्ठतम अधिकारी यांच्या उपस्थितीत सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी प्रतिज्ञा करावी व प्रतिज्ञा केल्यानंतर मा. राज्यपाल, मा. मुख्यमंत्री यांनी या सप्ताहानिमित्त दिलेला संदेश उपस्थितांना वाचून दाखवावा अशा सूचना शासन परिपत्रकानुसार दिल्या आहेत.

सप्ताहाबाबत आयोजित करावयाच्या कार्यक्रमाबाबत दि. १४ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या शासन परिपत्रकामध्ये सविस्तर कळविले आहे. तरी २७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत सर्व कार्यालय व विभागप्रमुखांनी दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करावा, असे निवासी उपजिल्हाधिकारी नांदेड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.



**नांदेड** : राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते अजित पवार हे शनिवारी नांदेड दौऱ्यावर होते. या दौऱ्यात त्यांनी दर्गात जाऊन चादर चढविली. यावेळी त्यांच्यासमवेत माजी मंत्री संजय बनसोडे आदी दिसत आहेत. (छाया : करणसिंह बैस)

# श्रीनिकेतन शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचा आज स्नेहमेळावा

**नांदेड (प्रतिनिधी)–** दीपक नगर तरोडा बुद्रुक भागातील श्रीनिकेतन हायस्कूल च्या २००२ -२००३ दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा आज दिनांक २६ ऑक्टोबर रोजी निळा रोड, नांदेड येथील एका हॉटेलमध्ये येथे माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांच्या स्नेह मेळाव्यात विद्यार्थी जीवनात एकत्र बसून खाल्लेले डब्बे, हातावर खाल्लेले छेड्या, पाठीवरती कौतुकाची थाप, मित्रांचा खांद्यावरचा हात आदी विद्यार्थी जीवनातील क्षण पुन्हा जागण्यासाठी तब्बल २२ वर्षानंतर हे विद्यार्थी एकत्र येत आहेत. आयोजित स्नेह मेळाव्यास श्रीनिकेतन शाळेतील माजी विद्यार्थी, शिक्षक उपस्थित राहावे असे आवाहन ज्ञानेश्वर शिरसाठ, सोनूताई बहात्रे, मोनिका भोकरे, पूजा हाटकर, मुरली कमठम, गौतम थोरात, अरुण पोहरे आदी माजी विद्यार्थ्यांनी केले आहे.

# लोहा, कंधार नगरपालिका निवडणूक पक्ष निरीक्षकपदी मोहनराव हंबर्डे यांची नियुक्ती

**लोहा (प्रतिनिधी)–** आगामी होऊ घातलेल्या नगरपालिका निवडणुकीसाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे पक्ष निरीक्षक म्हणून माजी आ. मोहनराव हंबर्डे यांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे पक्षाच्या वतीने कळविण्यात आले आहे.



आगामी होऊ घातलेल्या लोहा व कंधार नगरपरिषद निवडणुकीसाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी अजित पवार गट पक्षाच्या वतीने निवडणूक प्रक्रिया हाताळण्यासाठी निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. नांदेड दक्षिणचे माजी आ. मोहनराव हंबर्डे यांची लोहा निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्यासोबत नेताजी भोसले यांची तर कंधार नगरपालिकेसाठी मोहनराव हंबर्डे यांच्यासोबत डॉ. आशिया कौसर हबीब यांची नियुक्ती करण्यात आली असून लोहा व कंधार नगरपालिकेसाठी निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी माजी आ. मोहनराव हंबर्डे हे आगामी काळात पक्षात कडून काम पाहणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

# चालूक्य नगरीतील होट्टलमध्ये यशस्वी भूमिपुत्रांचा सन्मान



**होट्टल (प्रतिनिधी)–** चालूक्य नगरीतील यशस्वी भुमिपूत्रांचा होट्टलमध्ये सन्मान करण्यात आला. आपल्या मातीत जन्म घेतलेले, आपल्या परिश्रमाने मातीतून सुवर्ण फुलवणारे, समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे हेच खरे भूमिपुत्र. त्यांच्या कार्याचा सन्मान करणे, त्यांच्या प्रेरणादायी वाटचालीचा गौरव करणे आणि नव्या पिढीला त्यांच्या कार्यातून प्रेरणा देणे हा या भूमिपुत्र गौरव सोहळ्याचा मुख्य उद्देश आहे.

या सोहळ्याच्या माध्यमातून शेती, शिक्षण, सामाजिक कार्य, उद्योग, साहित्य, कला, क्रीडा आदी विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तींना सन्मानित करून त्यांचे योगदान समाजासमोर मांडण्याचा एक प्रयत्न आहे. तसेच, ग्रामीण भागातील तरुणांना प्रेरणा देऊन त्यांनीही आपल्या क्षेत्रात उत्तुंग शिखरे गाठावीत, यासाठी हा सोहळा एक व्यासपीठ ठरणार आहे. या सोहळ्यात प्रा. डॉ. जगदिश मनोहरराव देशमुख यांचे अध्यक्षीय भाषण अत्यंत प्रभावी व प्रेरणादायी ठराले. देशमुख सर हे शैक्षणिक क्षेत्रातील दिग्गज असून त्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला एक वैचारिक उंची लाभली.

सोहळ्याचे उद्घाटन प्रा. डॉ. प्रकाश सदाशिव सूर्यवंशी यांनी केले. त्यांच्या उद्बोधक भाषणाने उपस्थितांचे मन जिंकलं आणि भूमिपुत्रांच्या कर्तृत्वाचा सखोल विचार केला. याशिवाय, कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा. श्री विश्वनाथ रामराव कोंडेकर होते, ज्यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा संपूर्ण तयारीने आणि शिस्तीने पार पडला.

यावेळी चालुक्याचे वंशज साळुंखे कुटुंबीय उपस्थित होते. त्यांनी यावेळी सर्व घेईब व होतकरू विद्यार्थ्यांना मोफत पुस्तकांचे व वह्यांचे वाटप केले. जवळपास २०० जणांचा शाल, सन्मानचिन्ह व पुस्तक देऊन गौरव करण्यात आला. शेवटी सगळ्यांसाठी सुग्रास भोजनाचे आयोजन केले होते. कार्यकमाचे प्रास्ताविक डॉ विजय पाटील यांनी केले, सूत्रसंचालन श्री बोलेवाड यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रभू वंकलवार यांनी केले.

# आश्रमशाळेतील शिक्षकांच्या रिक्त पदासाठी उमेदवारांना अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प किनवट कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील आश्रमशाळेतील प्राथमिक शिक्षक, उच्च माध्यमिक शिक्षक ही पदे रिक्त भरावयाची आहेत. तरी पात्र उमेदवारांनी ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यत https://mvgcompany.in या संकेतस्थळावर अर्ज करावेत, असे आवाहन सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प किनवट यांनी केले आहे.

शासकीय आश्रमशाळेतील शिक्षकांची रिक्त पदे तात्पुरत्या स्वरुपात भरण्यासाठी बाह्यस्त्रोत संस्था मे. महाराष्ट्र विकास ग्रुप यांना आदेश दिला आहे. या संस्थेमार्फत अधिनस्त एकूण १६ शासकीय आश्रमशाळेवर नियुक्ती देण्यात आलेल्या शिक्षकांपैकी काही शिक्षक हे अद्याप शाळेवर हजर झालेले नाहीत. तेव्हा प्रकल्प कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील रिक्त असलेल्या पदांवर ऑनलाईन अर्ज करण्याबाबत मे. महाराष्ट्र विकास ग्रुप यांचेकडून आवाहन करण्यात आले आहे.

उच्च माध्यमिक शिक्षक या पदासाठी एमए (अर्थ/समाज/मराठी/इंग्रजी) / एमएससी (मॅथ/फिजीक्स/केमेस्ट्री/बायो) आणि बीएड (कम्पलसरी) व टीएआयटी स्कोअर. माध्यमिक शिक्षक या पदासाठी बीए/बीएससी (मराठी/इंग्रजी/विज्ञान/इतर) व बीएड. (अनिवार्य) आणि टीएआयटी स्कोअर. प्राथमिक शिक्षक पदासाठी (मराठी) डीएड आणि टीईटी -१ /सीटीईटी-१ (अनिवार्य) आणि टीएआयटी स्कोअर याप्रमाणे आहे. तरी उमेदवारांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# ओबीसी एल्गार महामोर्चाला मोठ्या संख्येने उपस्थित रहा; ॲड. अविनाश भोसीकर यांचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड येथे होणाऱ्या भटके विमुक्त, बलुतेदार आणि ओबीसी समाजाच्या एल्गार महामोर्चाला लाखोच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन ॲड. अविनाश भोसीकर यांनी केले आहे.

ओबीसी समाजाच्या आरक्षणावर जाणीवपूर्वक गदा आणण्याचे प्रयत्न होत असल्याचा आरोप करत ॲड. भोसीकर म्हणाले की, भटके, विमुक्त, बलुतेदार आणि ओबीसी समाजावर सतत अन्याय होत आहे. आरक्षणाचे हक्क हिरावून घेण्याचा कट रचला जात आहे. शासनाने २ सप्टेंबर २०२५ रोजी काढलेला ओबीसी विरोधी शासन निर्णय (जीआर) हा समाजघातक असून, तो तात्काळ रद्द करण्यात यावा. त्यांनी सांगितले की, समाजातील सर्व घटकांनी आता जागे व्हावे. आपला हक्क, आपली ओळख आणि आपला सन्मान वाचवण्यासाठी ओबीसी समाजाने एकदिलाने रस्त्यावर उतरले पाहिजे. हा मोर्चा ही केवळ निदर्शने नसून, आपल्या अस्तित्वासाठीची घोषणा आहे. असेही ते म्हणाले.


हा एल्गार महामोर्चा दि. २९ ऑक्टोबर २०२५ रोजी नांदेड येथे होणार आहे. मोर्चाची सुरुवात सकाळी ११ वाजता नवा मोंढा मैदानातून होईल. तेथून मोर्चा अण्णाभाऊ साठे चौक या मार्गे जिल्हाधिकारी कार्यालय येथे पोहोचेल. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मोर्चाचे रूपांतर प्रचंड जनसभेत होणार आहे. या सभेला ओबीसी आरक्षणाचे पुरस्कर्ते ॲड. प्रकाश आंबेडकर, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. ॲड. भोसीकर यांनी शासनावर तीव्र टीका करताना म्हटले की, ओबीसी समाजावर अन्याय सुरूच आहे. शासनाने दिलेल्या आरक्षणाला कमी करण्याचा, ते पातळ करण्याचा प्रयत्न होत आहे. काही समाजघटकांना खुश करण्यासाठी शासनाने ओबीसींच्या वाट्यातील आरक्षण गिळंकृत करण्याचा मार्ग अवलंबला आहे. हे आम्ही होऊ देणार नाही.


नांदेड येथील २९ ऑक्टोबरचा ओबीसी एल्गार महामोर्चा हा केवळ आंदोलन नाही, तर तो समाजाच्या आत्मसन्मानाची आणि न्यायासाठीच्या संघर्षाची घोषणा आहे. शासनाने लोकांच्या भावनांचा आदर करून योग्य निर्णय घेतले नाहीत, तर या आंदोलनाची लाट राज्यभर पसरू शकते, असा इशारा ॲड.अविनाश भोसीकर, नामदेव आईलवाड, डॉ. बी. डी. चव्हाण, सटवाजी माचनवार इत्यादी ओबीसी नेत्यांनी दिला आहे.

# चंदेरी

## शाहरुख बोरिंग, अक्षय कुमार प्रभावी

*असं का म्हणाले नसीरुद्दीन शाह...*





अभिनयासह स्पष्टवक्तेपणासाठी प्रसिद्ध असलेले अभिनेते नसीरुद्दीन शाह हे कायम वेगवेगळ्या विषयांवर मत व्यक्त करत असतात. आता त्यांनी स्टार म्हणून गिणल्या जाणाऱ्या खानांबद्दल महत्त्वपूर्ण वक्तव्य केलं आहे. ते म्हणाले, की मला फक्त अक्षय कुमारचं खूप कौतुक वाटतं. बाकी खानांपैकी कोणीच मला प्रभावित केलं नाही. मी कधीही त्यांचे चित्रपटही पाहिले नाहीत. अर्थात मी त्यांच्यासोबत बरेचदा काम केलं आहे, असे शाह म्हणाले.

कोणताही गॉडफादर आणि पाठिंबा नसताना अक्षयने ज्या पद्धतीने बॉलीवूड इंडस्ट्रीत स्वतःचं स्थान निर्माण केले आहे, हे कौतुकास्पद आहे. त्याची अभिनय क्षमता दिसून येते. शाहरुख खाननेही कोणाच्या पाठिंब्याशिवाय बॉलीवूडमध्ये यश मिळवलंय, याबद्दल शाह यांना विचारले असता ते म्हणाले, की हो आणि त्यासाठी मलाही शाहरुखचं खूप कौतुक आहे. पण एक अभिनेता म्हणून तो बोरिंग होत चालला आहे, अशी टीका त्यांनी केली. शाह यांनी अक्षय कुमार आणि शाहरुख खान यांच्यासोबत अनेकदा काम केले आहे. अक्षयसोबत त्यांचा सर्वात गाजलेला चित्रपट 'मोहरा' होय. शाहरुखबरोबर त्यांनी 'कभी हां कभी ना', 'चमत्कार' आणि 'मैं हूँ ना' या सिनेमांत काम केले आहे.

## 'सैराट'फेम तानाजी सध्या करतोय काय?



'सैराट'फेम अभिनेता तानाजी गालगुंडे सध्या काय करतो, असा प्रश्न साहाजिकच कुणालाही पडू शकतो. 'सैराट'नंतर त्याने अनेक चित्रपटांत छोट्यामोठ्या भूमिका केल्या. त्यानंतर सध्या तानाजी शेतीकाम करत असून, प्रेक्षकांना आता तो नव्या भूमिकेत कधी दिसणार, याची उत्सुकता लागली आहे.

नागराज मंजुळे दिग्दर्शित 'सैराट' चित्रपटाने मराठीच नव्हे तर हिंदी प्रेक्षकांनाही भुरळ घातली होती. २०१६ साली हा चित्रपट आला होता. आर्ची-परशा यांच्यासह सल्ल्या- बाळ्याही लोकप्रिय झाले होते. चित्रपटात 'लगंड्या' म्हणून लोकप्रिय झालेल्या तानाजीने 'परशा आर्ची आली रे आली'ची दिलेली हाक अजूनही प्रेक्षकांच्या कानातून गेलेली नाही. तानाजी सोशल मीडियावर ॲक्टिव्ह असतो. तो त्याचे अनेक फोटो-व्हिडीओ शेअर करत असतो. त्याचं स्वतःचं यूट्यूब चॅनेलही आहे. यातून तो शेतातील काही खास क्षण चाहत्यांसोबत शेअर करतो. त्याला स्वयंपाकही चांगला येतो. तानाजीचा साधेपणा अनेकांना भावतो. 'सैराट'नंतर तानाजीने 'गस्त', 'झुंड', 'फ्री हिट दणका', 'एकदम कडक' या चित्रपटांतही काम केले. 'घर बंदूक बिरयानी' व 'नवरदेव बी.एस.सी.ॲग्री' या चित्रपटांतही तो झळकला होता. आता आणखी कोणत्या नवीन भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार, याची उत्सुकता सर्वांना लागली आहे.

### 'बालिका वधू' अविका गौरची विशेष मुलाखत

# मिलिंद खूप संयमी, समजूतदार... मला प्रेरणा अन् पाठिंबा देतो!

**प्रेक्षकांची लाडकी 'बालिका वधू' अभिनेत्री अविका गौर आता खऱ्या आयुष्यातही वधू बनली आहे. अलीकडेच अविकाने तिचा प्रियकर मिलिंद चांदवानीसोबत सातफेरे घेतले. विशेष म्हणजे अविका आणि मिलिंदने त्यांच्या टीव्ही शो 'पती, पत्नी और पंगा'च्या सेटवरच खरेखुरे लग्न केले. ज्याचे संपूर्ण जग त्यांच्या खऱ्या लग्नाचे साक्षीदार झाले. अविकाने लग्नानंतर आमच्याशी केलेली खास बातचीत...**



**प्रश्न : लग्नानंतरची ही तुझी पहिलीच दिवाळी. तुझ्यासाठी किती खास राहिली दिवाळी?**

» **अविका** : लग्नानंतरची ही पहिलीच दिवाळी असल्याने आम्ही खूप आनंदीत होतो. आम्ही हैदराबादला गेलो होतो, जिथे मिलिंदचे कुटुंबीय राहतात. आम्ही खूप मौजमजा केली. गेल्या वर्षी मी वृंदावनमध्ये शूटिंग करत होते आणि एक दिवस सुट्टी होती, म्हणून आम्ही मिलिंदच्या आजीच्या घरी गेलो होतो. त्या ग्वाल्हेरमध्ये राहतात. तेव्हा आम्ही त्यांच्यासोबत दिवाळी साजरी केली होती. मी नेहमीच काहीतरी छान आणि मनोरंजक करण्याचा प्रयत्न करते. यावेळीही ते केले.

**प्रश्न : तू आधी संपूर्ण देशासाठी बालिका वधू (वधू) होतीस, आता तू खरोखर मिलिंदची वधू झाली आहेस. तुला वेगळे वाटते का?**

» **अविका** : खरं सांगायचं तर, लग्नाबद्दल खूपच चर्चा असतात. त्यामुळे मला वाटलं होतं की ते खूप वेगळे असते. पण तसं काही मला जाणवलं नाही. मला फक्त अधिक मॅच्युअर झाल्यासारखं वाटतं. ठळक बदल म्हणजे, आम्ही दोघेही (मिलिंद आणि अविका) एकत्र आयुष्याचा सामना करू. आमची कुटुंबे एक झाली आहेत. मनात अनेक सकारात्मक गोष्टी येतात.

**प्रश्न : 'पती, पत्नी और पंगा' या टीव्ही शोच्या सेटवर तू लग्न करण्याचा निर्णय का घेतलास? यावर मिलिंद आणि तुझ्या कुटुंबाची प्रतिक्रिया काय होती?**


» **अविका** : मी लहानपणापासूनच टीव्ही सेटवर आहे. प्रेक्षकांनी माझ्यावर खूप प्रेम केले आहे. म्हणून मला वाटले की माझ्या आयुष्यातील सर्वात खास क्षणाचा भाग होण्याची ही त्यांची एकमेव संधी आहे. तरीही, मी हा निर्णय एकटा घेऊ शकत नव्हते. पण जेव्हा मी मिलिंद आणि आमच्या कुटुंबियांशी याबद्दल बोलले तेव्हा सर्वजण खूपच उत्साहित झाले. कारण आम्ही इतिहास घडवत होतो. लहानपणापासूनच एखाद्या चॅनेलशी असे संबंध असणे यापूर्वी कधीही घडले नव्हते. तेही खूप आनंदी होते.

**प्रश्न : लग्नाच्या निवडीबाबत तुम्ही काही अटीही ठेवल्या होत्या का?**

» **अविका** : हो. उदाहरणार्थ, आमचे लग्न पूर्ण गुजराती विधींनी पार पडले, अगदी आम्हाला हवे तसे. मला लेहेंगा माझ्या आवडीचा हवा होता. आम्ही खूप काळजीपूर्वक नियोजन केले. आमच्या जवळच्या कुटुंबातील सदस्यांनी उपस्थित राहावे अशी आमची इच्छा होती आणि ते तिथे होते. एकंदरीत, निर्मात्यांनी हा केवळ एक शो नसून आमच्या आयुष्यातील सर्वात संस्मरणीय दिवस बनविणे शक्य केले, म्हणून सर्वकाही आमच्या अपेक्षांपेक्षा जास्त होते.

**प्रश्न : पण लग्नाचे विधी तुमच्या मित्रांनी आणि नातेवाईकांनी नव्हे तर शोच्या कलाकारांनी केले. जसे की, हिना खानने बूट चोरले, तर देबिना आशीर्वाद घेत होती?**

» **अविका** : मी हिना आणि ईशाला माझ्या आयुष्यात ते स्थान दिले आहे. म्हणून त्यांना ते हक्काचे वाटले. हिना आणि ईशाने बूट चोरले हे मला खूप आवडले. इतकेच नाही तर, मुनव्वर माझी फुलांची चादर घेऊन आली. कृष्णा देखील खूप भावनिक होता. त्याने स्वतः मला सांगितले की तो हे फक्त त्याची बहीण आरतीसाठी करतो. सर्वांनी मला खूप प्रेम दिले आणि मला स्वतःचे मानले, म्हणून हे नाते माझ्यासाठी खूप महत्वाचे झाले आहे.



**प्रश्न : हे सर्व एका शो म्हणून शूट केले जात होते, म्हणून रिटेक झाले असतील. काही मजेदार किंवा विचित्र रिटेक होते का?**

» **अविका** : अर्थात, मला एक रिटेक आठवतो जिथे माझी एन्ट्री दोनदा झाली होती. मला ते मजेदार वाटते. कारण मला मिलिंद किमान एकदा तरी रडेल अशी अपेक्षा होती, पण तो बिचारा दोन्ही वेळा रडला (हसते). त्याने माझ्यासाठी इतक्या भावना दाखवल्या हे पाहून मी खूप भावनिक झाले.

**प्रश्न : तुम्ही दोघेही लग्नादरम्यान शूटिंगमध्ये व्यस्त होतात. हनिमून ब्रेकसाठी तुमचे काय प्लॅन आहेत?**

» **अविका** : आम्ही नक्कीच याबद्दल विचार केला आहे. प्रथम, हा शो संपू द्या, नंतर लगेचच आम्हाला एकत्र ट्रिप प्लॅन करायची आहे. आम्ही यापूर्वी अनेक ट्रिप एकत्र केल्या आहेत. आम्ही मालदीव ते तुर्की आणि इतर अनेक ठिकाणी खूप प्रवास केला आहे. म्हणून, आम्ही विचार करत होतो की लग्नानंतर आम्ही पहिल्यांदाच घरी जाणार असल्याने ते काहीतरी खास असावे. आपण काहीतरी वेगळे केले पाहिजे.

**प्रश्न : मिलिंदमध्ये असे कोणते गुण होते ज्यामुळे तुला तो जीवनसाथी म्हणून योग्य वाटला? तो तुला कसा परिपूर्ण वाटतो?**

» **अविका** : तो खूप समजूतदार, धीरवान आहे. माझ्याकडे हे गुण नाहीत (हसते). तो खूप संयमी आहे. समस्या काहीही असो, तो ती सहजपणे सोडवतो, म्हणून आम्ही भांडत नाही. मला याची आठवण येते, पण ती त्याची महाशक्ती आहे. तो सर्वकाही सोपे करतो. तो प्रत्येक गोष्टीत मला पूरक ठरतो. तो मला प्रेरणा देतो. जर मला माझा मूड सुधारण्यासाठी विनोद करायचा असेल, तर तो अशा बालिश गोष्टींमध्येही मला पाठिंबा देतो. आम्हाला आमच्यात एक उत्तम संतुलन सापडते. आम्ही जवळजवळ साडेसहा वर्षे एकत्र आहोत आणि दररोज मला असे वाटते की हा माणूस नेहमीच मला प्रभावित करण्याचा प्रयत्न करतो, जे मला खरोखर आवडते.

### अभिनेत्री कोंकणा सेन-शर्माची विशेष मुलाखत : पुरुषी अहंकारावर व्यक्त होण्याबद्दल म्हणाली...

# माझ्याकडे संयम नाही, हृदयाचे ठोके लगेच वाढतात!

**कोंकणा सेन-शर्मा अत्यंत प्रतिभावान आणि सुंदर अभिनेत्री आहे. ती अनेकदा मुद्द्यांवर परखडपणे व्यक्त होत असते. लोक तिच्याबद्दल काय विचार करतात याची तिला पर्वा नसते. ती एकाहून एक सरस भूमिकांना पडद्यावर जीवंत करण्यासाठी ओळखली जाते. सध्या ती तिची नवीन मालिका 'सर्च : नैना मर्डर केस'मध्ये पोलीस अधीक्षक (एसपी) संयुक्ता दासच्या भूमिकेमुळे चर्चेत आहे. यानिमित्ताने आम्ही कोंकणाशी खास संवाद साधला...**



**प्रश्न : एकाचवेळी जॉब आणि घर या दोन गोष्टी सांभाळताना आव्हानात्मक परिस्थिती उद्भवते. ही बाब तुझ्या मालिकेतही अधोरेखित केली आहे. आई म्हणून अभिनयासारख्या कठीण व्यवसायात असताना तू संतुलन कसे साधते?**

» **कोंकणा** : मी खूप भाग्यवान आहे. कारण हारूनचे (मुलगा) वडील (अभिनेता रणवीर शौरी) त्याच्या संगोपनात माझ्याइतकेच जबाबदारीने वागतात. त्यांचा मला चांगला सपोर्ट आहे. यामुळे मला काळजी न करता कुठेही येता जाता येते. आम्ही दोघेही कामासाठी वारंवार प्रवास करतो. पूर्वी आजी-आजोबा आणि काका- काकूंसारखे कुटुंबातील सदस्य एकत्र असायचे, परंतु आज जेव्हा आपल्याकडे एकटे कुटुंब असते किंवा इतर शहरांमध्ये राहायला जातात तेव्हा घर आणि कामाचे संतुलन साधणे निश्चितच एक मोठा संघर्ष आहे. परंतु सध्या आपल्याकडे उपाय नाही.

**प्रश्न : वर्क-लाइफ बॅलन्सची गोष्ट आपण करत आहोत तर सध्या शूटिंगसाठी तास ठरवून देण्याबद्दल सध्या तो विवाद सुरू आहे, त्यावर तुझे काय मत आहे?**

» **कोंकणा** : मी पूर्णपणे सहमत आहे की कामाचे तास निश्चित केले पाहिजेत. कारण केवळ कलाकारच नाही तर आपले तंत्रज्ञ देखील त्याहूनही जास्त तास काम करतात. म्हणून, माझा विश्वास आहे की सहा दिवसांचा कामाचा आठवडा असावा. उदाहरणार्थ, फ्रान्समध्ये, काम आठवड्यातून फक्त चार दिवस आहे आणि तेथे उत्पादकता वाढली आहे. अर्थात, तो एक वेगळा देश आहे, परंतु भारतातही काम आठवड्यातून सहा दिवस आणि १२ तासांच्या शिफ्टमध्ये असले पाहिजे. हे मूलभूत तत्व आहे. त्याचे नियोजन केले पाहिजे. अगदीच आवश्यक असल्यास १४-१५ तास काम करणे ठीक आहे, परंतु हे ते नेहमीच नसावे.

**प्रश्न : सर्च : नैना मर्डर केस या मालिकेत हे देखील दाखवले आहे की एका सक्षम महिला अधिकाऱ्याच्या हाताखाली काम केल्याने तिच्या पुरुष सहकाऱ्याचा पुरुषी अहंकार दुखावतो. आपण या पुरुषप्रधान मानसिकतेवर कधी मात करू शकू का?**

» **कोंकणा** : हो, ही एक समस्या आहे. पितृसत्ता आपल्या समाजात खोलवर रुजलेली आहे. मी स्वतः हे बरेच पाहिले आहे. मात्र तुम्ही तुमचा अधिकार कसा मांडता यावरदेखील बऱ्याच गोष्टी अवलंबून आहेत. कोणत्याही गोष्टी कृतीतून व्हायला हव्यात. म्हणजे तुम्ही एखाद्यावर विसंबून असाल आणि त्यालाच दुखावण्याचा प्रयत्न करत असाल तर हे चूक ठरू शकते. पण तुम्ही स्वतः काहीतरी पद-प्रतिष्ठा राखून आहात. तेव्हा समोरचाही तुमच्याबद्दल आदरभाव बाळगून असतो. त्यामुळे आधी प्रत्येक महिलेने स्वतः काहीतरी बनले पाहिजेत. नीट सगळ्या गोष्टी समजून बोलले पाहिजेत. विनाकारण अहंकार आणि फाजील आत्मविश्वास बाळगण्यात काहीच अर्थ नाही. मला माझे पात्र एसीपी संयुक्ता दास इतके प्रतिभावान वाटले, की ती चिडवल्यावरही तिचा संयम गमावत नाही. हे कौशल्य अनेक वर्षांच्या अनुभवातून येते, कठीण परिस्थिती आणि लोक ती हाताळते. तथापि, ती तिच्या सहकाऱ्याला एक गोष्ट म्हणते, की तू मला माझ्या किशोरवयीन मुलीची आठवण करून देतोस... मला वाटते की ही एक ओळ कोणत्याही पुरुषत्वाचे पाणी पाणी करू शकते.

**प्रश्न : जर कोणी तुझ्याशी पुरुषी अहंकाराने वागले तर तू काय करशील?**

» **कोंकणा** : मला माहीत नाही, पण मी त्याला चापट मारू शकते... मी विनोद करतेय, पण मी नक्कीच उलट उत्तर देईन. माझ्याकडे तेवढा संयम नाही. माझ्या हृदयाचे ठोके लगेच वाढून जातात.

**प्रश्न : सर्च : नैना मर्डर केस मालिका लोकप्रिय मालिका द किलिंगचे हिंदी व्हर्जन आहे. एक अभिनेता म्हणून तुला दुसऱ्याची नक्कल करण्याचा किंवा त्याची पुनरावृत्ती करण्याचा धोका जाणवला का?**

» **कोंकणा** : मी मूळ मालिका पाहिली आहे. ती मला खूप आवडली. त्यातील महिला गुप्तहेर अभिनेत्री सारा लुंड आहे. तिची भूमिका मला साकारायला मिळाली, याबद्दल ती खूप उत्साहित आहे. शिवाय ती मोठी जबाबदारी आहे. मला कोणत्याही गोष्टीची नक्कल करण्याचा किंवा पुनरावृत्ती करण्याचा धोका जाणवला नाही. कारण मला माहित होते की मी डॅनिश पोलिस महिलेसारखी होणार नाही. दिग्दर्शक रोहन सिप्पी आणि त्यांच्या टीमने ती भारतीय वातावरणाशी सुंदरपणे जुळवून घेतली आहे.

**प्रश्न : तू स्वतः एक हुशार दिग्दर्शक आहेस. तू लवकरच तुझी स्वतःची विनोदी मालिका दिग्दर्शित करणार आहेस. त्याबद्दल आम्हाला काही सांगशील? तुझ्या दिग्दर्शक अभिनय करताना कधी जागृत होतो का?**

» **कोंकणा** : नाही, नाही, अजिबात नाही, कारण मी इतकी वर्षे अभिनय करत आहे. मी एक बालकलाकार होते. लहानपणापासूनच अभिनय करत आहे. मी ५५ हून अधिक चित्रपटांमध्ये काम केले आहे. मी मुळात एक अभिनेत्री आहे. मी खूप कमी दिग्दर्शन केले आहे. मी स्वतः लिहितानाच दिग्दर्शन करते. एक दिग्दर्शक म्हणून, मला सर्व उत्तरे माहित आहेत; नाहीतर, मी बाय डिफॉल्ट अभिनेत्री आहे. माझ्या पुढच्या मालिकेबद्दल बोलणे खूप लवकर होईल. त्यामुळे तूर्त इतकेच सांगते.

# १ नोव्हेंबरपासून जीएसटी एकदम सरल होणार –निर्मला सीतारामन



**मुंबई(प्रतिनिधी)**–१ नोव्हेंबर २०२५ पासून सरकार एक सरलीकृत वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) नोंदणी प्रणाली लागू करेल, ज्यामुळे बहुतेक नवीन अर्जदारांना तीन कामकाजाच्या दिवसांत स्वयंचलित मान्यता मिळेल, अशी घोषणा अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी केली आहे.

जीएसटी परिषदेने यापूर्वी मंजूर केलेल्या जीएसटी २.० सुधारणा पॅकेजचा भाग असलेल्या या उपाययोजनाचा उद्देश अनुपालन सुलभ करणे आणि नोंदणी प्रक्रियेत मानवी हस्तक्षेप कमी करणे आहे असे सरकारने यापूर्वीच स्पष्ट केले आहे. यातून जीएसटी सुविधा सुलभ होणार आहे. त्यामुळे यातील क्लिष्टता सरकारने रद्द करत कर दात्यांची अनुपालन चौकट मजबूत केली आहे. सरकारने दिलेल्या माहितीनुसार, नवीन चौकटीअंतर्गत, स्वयंचलित नोंदणी दोन प्रकरणांमध्ये उपलब्ध असणार आहे. जोखीम आणि डेटा विश्लेषणाच्या आधारे प्रणालीद्वारे ओळखले जाणारे अर्जदार आणि जे स्वतः मूल्यांकन करतात की, त्यांची आउटपुट कर देयता दरमहा २.५ लाख रुपयांपेक्षा जास्त होणार नाही. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी भाष्य केल्याप्रमाणे जवळजवळ ९६% नवीन अर्जदारांना या सरलीकृत मंजुरी मार्गाचा फायदा होईल. गाझियाबादमधील नवीन सीजीएसटी भवनाचे उद्घाटन केल्यानंतर बोलताना सीतारामन म्हणाल्या आहेत की, सरकारचे लक्ष आता धोरण डिझाइनपासून क्षेत्रीय स्तरावरील अंमलबजावणीकडे वळले आहे.

त्या म्हणाल्या की, कर प्रशासनाने करदात्यांना सन्मानाने वागवले पाहिजे आणि करचोरीविरुद्ध कडक भूमिका घेतली पाहिजे. 'करदात्यांना असे वाटले पाहिजे की, त्यांना सन्मानाने वागवले जात आहे, कारण ते देशाचे करदाते आहेत. 'करदात्यांमध्ये जर वाईट लोक असतील तर त्यांना पकडण्यासाठी प्रोटोकॉलचे पालन करा. 'पण प्रत्येकाकडे संशयाने पाहू नका,' असे त्यांनी केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळाच्या (सीबीआयसी) अधिकाऱ्यांना यावेळी सांगितले आहे. व्यापक जीएसटी २.० पॅकेजचा भाग म्हणून सरकारने दर स्लॅब-मध्ये बदल केले आहेत, रिटर्न फाइलिंग सोपे केले आहे आणि स्वयंचलित परतावा आणि जोखीम-आधारित ऑडिट सिस्टम सुरू केले आहेत.

कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स च्या आकडेवारीचा हवाला देत सीतारमण यांनी नमूद केले की या दिवाळीत भारतातील उत्सवी किरकोळ विक्री विक्रमी ६.०५ ट्रिलियन रुपयांवर पोहोचली – गेल्या वर्षीच्या तुलनेत २५% वाढ – ज्यामध्ये ८७% ग्राह कांनी भारतीय बनावटीच्या उत्पादनांना प्राधान्य दिले. सर्वेक्षणात सहभागी झालेल्या सुमारे ७२% व्यापाऱ्यांनी दैनंदिन वापराच्या वस्तू, पादत्राणे, गृहसजावट आणि ग्राहकोपयोगी वस्तूंवरील अलीकडील जीएसटी दर कपातीमुळे वाढलेल्या विक्रीचे श्रेय दिले. 'मला विश्वास आहे की, सतत सुधारणा, समर्पण आणि टीमवर्कसह, आपण महसूल, अनुपालन आणि सेवा वितरणात नवीन उंची गाठू. आमचे अंतिम ध्येय प्रामाणिक करदात्याचे जीवन सोपे करणे आहे.' असे सीतारामन म्हणाल्या आहेत.

वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) २०१७ मध्ये लागू झाल्यापासून भारताच्या करप्रणालीत एक मोठा बदल घडवून आणत आहे. जवळजवळ दोन दशकांच्या विचारविनिमय आणि नियोजनानंतर, देशाने राज्य आणि केंद्रीय करांचे गुंतागुंतीचे जाळे सुलभ करण्यासाठी एक एकीकृत कर रचना स्वीकारली. पण जीएसटीचा प्रवास काहीसा सुरळीत राहिला आहे. गेल्या आठ वर्षांत झालेल्या चढउतारांसह, भारत सरकार आता २०२५ मध्ये पुढील पिढीच्या जीएसटी सुधारणा लागू करत आहे. या सुधारणा करप्रणालीला अधिक सुलभ करण्यासाठी आणि सामान्य माणसाचे जीवन अधिक परवडणारे बनवण्यासाठी डिझाइन केल्या आहेत. पण त्याचे फायदे खरोखर तुमच्यापर्यंत पोहोचतील का, की हे सरकारच्या दीर्घकालीन आर्थिक धोरणातील आणखी एक पाऊल असेल? चला ते पाहूया.

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरूपदी डॉ. अजय चंदनवाले

**नाशिक (प्रतिनिधी)**–राज्य शासनाने वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाचे संचालक डॉ. अजय चंदनवाले यांची नियुक्ती 'महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (एमयुएचएस) या संस्थेच्या कुलगुरुपदी नियुक्ती केली आहे. ही नियुक्ती पुढील सहा महिन्यांसाठी असेल. याबाबतचा आदेश 'एमयुएचएस' चे कुलपती आचार्य देवव्रत यांनी जारी केल्यानंतर त्यावरून राज्यपाल कार्यालयाचे सचिव प्रशांत नारनवरे यांनी गुरुवारी (ता. २३) आदेश निर्गमित केले आहेत. डॉ. चंदनवाले यांच्याकडे 'एमयुएचएस' च्या कुलगुरू पदाबरोबर वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाचे संचालक (डीएमईआर) या पदाचीही धुरा असणार आहे.

याआधी 'एमयुएचएस' च्या कुलगुरू लेफ्टनंट जनरल डॉ. माधुरी कानिटकर या होत्या. त्यांचा कार्यकाळ १४ ऑक्टोबर रोजी संपल्याने त्या सेवानिवृत्त झाल्या असून रिक्त पदावर डॉ. चंदनवाले यांची नियुक्ती झाली आहे. डॉ. चंदनवाले यांनी ससून रुग्णालयात अधिष्ठाता पदावर दहा वर्षे होते. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी ससून रुग्णालयात विविध उपक्रम व योजना राबवत रुग्णालयामध्ये सुधारणा केली. यामध्ये प्रामुख्याने रुग्णालयातील विविध सुविधा व श्रेणीवर्धनासाठी १०० कोटींहून अधिक निधी हा विविध सामाजिक संस्था, उद्योजक यांच्या माध्यमातून 'सामाजिक उत्तरदायित्व निधी' (सीएसआर फंड) उभा केला. त्याचा थेट फायदा गोरगरीब रुग्णांना झाला. यामध्ये अद्ययावत आपत्कालीन विभाग विभाग, ५९ खाटांचा नवजात कक्ष, दगडूशेठ हलवाई मंदिराकडून रुग्णांसाठी मोफत भोजन यांचा उल्लेख करता येईल.

कोरोना काळात २०२० मध्ये त्यांची नियुक्ती 'डीएमईआर' च्या सहसंचालक पदावर झाली. तर जुलै २०२३ मध्ये ते प्रभारी संचालक झाले. तर काही महिन्यांपूर्वी ते पूर्णवेळ संचालक देखील झाले. आता त्यांच्याकडे एमयुएचएस' च्या कुलगुरुपदाची जबाबदारी सोपविण्यात आली असून या पदाला न्याय देणार असल्याचे त्यांनी सांगितले.


**रक्तदान सर्वश्रेष्ठ दान**



**Change In Name**

My old name SHUKOOR KHAN which now I am changing as New Name SHUKOOR KHAN ISMAIL KHAN Hence forth my all correspondance will be done as per my New Name. Please consider the same. Address -SHUKOOR KHAN ISMAIL KHAN UMAR COLONY NANDED-431601

Mobile No. 9834716818



**Change In Name**

My Old Name is NUNE RAMESH GANGADHARRAO which now I am changing to (New Name) RAMESH GANGADHAR NUNE Hence forth my all correspondence be done as per my New Name. Please consider the same.

Address-H. No. 1-14-775, SADBHAVANA VIDYUT NAGAR NANDED-431605

Mo. No. 9823131361


## महाराष्ट्रात 'गुजरात पॅटर्न'? अनेकांना डच्चू देण्याची तयारी

**मुंबई(प्रतिनिधी)**–गुजरातनंतर आता महाराष्ट्रात कॅबिनेटमध्ये मोठे बदल होण्याची शक्यता आहे. सुमार कामगिरी करणाऱ्या, वादग्रस्त ठरलेल्या अनेक मंत्र्यांना घरचा रस्ता दाखवून त्यांच्या जागी नव्या चेहऱ्यांना संधी दिली जाऊ शकते. पुढील वर्षभरात मंत्र्यांच्या कामगिरीचा आढावा घेतला जाईल. त्यांच्या कामाचं मूल्यमापन होईल. त्यामुळे अनेक मंत्र्यांची धाकधूक वाढली आहे. शिंदेसेनेचे अनेक मंत्री वर्षभरात गोत्यात आले आहेत. त्यामुळे त्यांच्यापैकी कोणाकोणाला नारळ मिळणार याची चर्चा आतापासूनच रंगू लागली आहे.

राज्यातील महायुती सरकारनं अद्याप वर्ष पूर्ण केलेलं नाही. आम्ही मंत्र्यांना काम करण्यास, स्वत:ला सिद्ध करण्यास पुरेसा वेळ देऊ, अशी माहिती भाजपच्या एका वरिष्ठ नेत्यानं दिली. मिड डेनं याबद्दलचं वृत्त दिलं आहे. दोन किंवा अडीच वर्षांनी मंत्र्यांच्या कामगिरीचा आढावा घेतला जातो. ज्यांना अपेक्षित कामगिरी करता येणार नाही, त्यांना नारळ देण्यात येईल, अशा शब्दांत भाजपच्या वरिष्ठ नेत्यानं पुढील प्लान सांगितला.

भाजपनं गेल्याच आठवड्यात गुजरातमधील मंत्रिमंडळात मोठे बदल केले. सरकारमधील सर्वच्या सर्व १६ मंत्र्यांचे राजीनामे घेण्यात आले. केवळ मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांचा राजीनामा घेतला गेला नाही. यानंतर दुसऱ्याच दिवशी २५ आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. यात अनेक नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली. मागील सरकारमधील केवळ ६ जणांना पुन्हा संधी दिली गेली. नव्या मंत्रिमंडळातील १२ जण हे पहिल्या टर्मचे आमदार आहेत. आता हाच गुजरात फॉर्म्युला महाराष्ट्रात लागू होण्याची शक्यता आहे.

एकनाथ शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे काही मंत्री वादात सापडले आहेत. त्यांच्या वर्तणुकीमुळे महायुती सरकारची प्रतिमा डागाळली आहे. आतापर्यंत केवळ धनंजय मुंडे यांच्या मंत्रिपदाचा राजीनामा झाला आहे. अन्य वादग्रस्त मंत्र्यांना केवळ समज देण्यात आली आहे. यातील अनेकांना पुढील वर्षभरात डच्चू मिळू शकतो.

गेल्या वर्षी राज्यात विधानसभा निवडणूक झाली. ५ डिसेंबरला फडणवीस सरकार अस्तित्वात आलं. सध्याच्या घडीला मंत्रिमंडळात ३९ सदस्य आहेत. यातील ३३ कॅबिनेट, तर ६ राज्यमंत्री आहेत. सर्वाधिक मंत्री भाजपचे आहेत. मंत्रिमंडळात भाजपचे १९, शिंदेसेनेचे ११ आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे ९ जण आहेत.

## बॅनर फाडल्यावरुन किरकोळ वाद; बेदम मारहाणीत १७ वर्षीय तरुणाला संपवलं

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)**–पैठण तालुक्यातील बिडकीन परिसरात बॅनर फाडल्याच्या किरकोळ कारणावरून गुरुवारी दि. २३ ऑक्टोबरच्या रात्री दोन गटांत झालेल्या तुंबळ हाणामारीत एका १७ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला आहे.



रात्री सुमारे १० ते १०.३० वाजण्याच्या सुमारास बिडकीन बसस्थानक परिसरात दोन गटां-मध्ये बॅनर फाडल्याच्या कारणावरून वाद झाला. वाद चिघळताच तुंबळ मारहाण झाली. यात तन्मय चोरमारे (वय १७, रा. बिडकीन) आणि संतोष ठाणगे हे दोघे गंभीर जखमी झाले. दोघांना तातडीने छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र, उपचारादरम्यान काल शुक्रवारी सकाळी तन्मय चोरमारे या तरुणाचा मृत्यू झाला. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली.

छत्रपती संभाजीनगरमध्ये सध्या गुन्हेगारीच्या प्रमाणात मोठी वाढ झाली असून, पोलीस प्रशासनाने या प्रकरणी लक्ष घालावे, अशी सर्वसामान्य नागरिकांकडून अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## शेतकऱ्यांप्रमाणे मच्छीमारांना सवलतीच्या दरात वीज

**मुंबई (प्रतिनिधी)**–राज्य सरकारने मच्छिमार बांधवांसाठी मोठा दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळ बैठकीत मस्त्य व्यवसायाला (मत्स्य व्यवसाय) कृषी क्षेत्राचा दर्जा देण्यात आला असून, त्यानुसार मच्छिमारांना शेतकऱ्यांप्रमाणेच सवलतीच्या दरात वीज पुरवठा उपलब्ध होणार आहे. ही घोषणा मंत्री नितेश राणे यांच्या दीर्घकाळाच्या मागणीनंतर घेण्यात आली असून, मच्छिमार, मत्स्यसंवर्धक, मत्स्य व्यवसायिक आणि मत्स्यकास्तकार यांना मोठा फायदा होणार आहे. या निर्णयामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होईल आणि मत्स्य उत्पादनातही वाढ अपेक्षित आहे.


**जाहीर प्रगटन**

मौजे वसरणी ता. जि. नांदेड मनपा हद्दीतील शेत सर्व्हे नंबर २६ मधील प्लॉट नंबर १०५ एकूण साईज लांबी-पूर्व-पश्चिम-४० फुट म्हणजे १२.१९ मीटर व रुंदी दक्षिण-उत्तर-३० फुट म्हणजे ९.१४ मीटर एकूण क्षेत्रफळ १२०० चौरस फुटाचा प्लॉट (मूळ मालक डॉ. दिनकर राजेश्वरराव कमटलवार) तर्फे विजय पांडुरंगराव लामदाडे रा. जुना कौठा नांदेड यांचेकडून निलेश देवराव देशमुख रा. उंचेगाव ता. हदगाव, जि. नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून, त्याची चतुसिमा पुढीलप्रमाणे आहे.

**प्लॉटची चतु:सिमा**– पूर्वेस-२० फुट रुंद रोड, पश्चिमेस :- प्लॉट नं. १८८, दक्षिणेस :- प्लॉट नं. १०६, उत्तरेस:-प्लॉट नं. १०४ आहे.

तरी वरील चतु:सिमेच्या आतील पूर्ण शेत जमीन विषयी कोणाचा काही हक्क, उजर, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, हक्क, आक्षेप जे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्याच्या ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही व प्लॉटचे खरेदीखत करून घेण्यात येईल. करिता हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

जाहीर प्रगटन देणार
निलेश देवराव देशमुख रा.
उंचेगाव, ता. हदगाव, जि. नांदेड
मो.८३२९६६८२१९,
९७६५७३२६७२


# १ नोव्हेंबर २०२५ पासून बँकिंग अधिनियम कायद्यात मोठे फेरबदल

**मुंबई(प्रतिनिधी)**–१ नोव्हेंबर २०२५ पासून बँकिंग(सुधारणा) कायदा, २०२५ अंतर्गत नवीन नियम लागू होणार आहेत. बँकेच्या नवीन नियमावलीत काही महत्वपूर्ण बदल होतीत त्यातील एक प्रमुख बदल म्हणजे बँक ग्राहक आता ४ नामांकन ठेवू शकतील. त्यामुळे ग्राहकांच्या मृत्यूपश्चात अथवा अडीअडचणीला ठेवीदारांना त्यांच्या मृत्यूच्या बाबतीत त्यांचे पैसे किंवा मौल्यवान वस्तू कोणाला मिळतील हे ठरवणे सोपे होणार आहे. १५ एप्रिल २०२५ रोजी अधिसूचित केलेल्या या कायद्यात रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कायदा, बँकिंग नियमन कायदा, स्टेट बँक ऑफ इंडिया कायदा आणि बँकिंग कंपन्या कायद्यांसह अनेक बँकिंग कायद्यांमध्ये १९ सुधारणा करण्यात आल्या आहेत. केंद्र सरकारने असा निर्णय घेतला आहे की नामांकनांशी संबंधित कलम १०, ११, १२ आणि १३ १ नोव्हेंबर २०२५ पासून सुरू होतील. या कलमांमध्ये ठेव खाती, सुरक्षित कस्टडी आयटम आणि लॉकर सामग्री समाविष्ट आहे.

यापूर्वी, दुरुस्ती कायद्यातील काही इतर तरतुदी १ ऑगस्ट २०२५ पासून लागू झाल्या होत्या. या कायद्याचा उद्देश एकूणच प्रशासन सुधारणे, ठेवीदार आणि गुंतवणूकदारांचे संरक्षण करणे, सार्वजनिक क्षेत्रा-तील बँकांमध्ये ऑडिट मजबूत करणे आणि बँकिंग अधिक ग्राहक-अनुकूल बनविणे आहे असे यावेळी सरकारने स्पष्ट केले आहे.

महत्वाचा बदल म्हणजे एकाच वेळी किंवा एकामागून एक चार लोकांना नामांकित करू शकता तसेच ठेवीवर तुम्ही एकाच वेळी नामांकने (सर्व नामांकित व्यक्तींना निश्चित शेअर मिळतो) किंवा सलग नामांकने म्हणजे आधीच्या नामांकित व्यक्तीचे निधन झाल्या सच पुढील नामांकन सक्रिय होते या दोन्हीपैकी अथवा दोन्ही तुम्ही पर्याय निवडू शकता. तसेच एकाच वेळी नामांकनांसाठी, तुम्ही नामांकित व्यक्तींमध्ये एकूण हक्क विभागू शकता जेणेकरून एकूण रक्कम १००% पर्यंत रक्कम विभागू शकणार आहात. सुरक्षित ताबा आणि लॉकर सुविधांमध्ये असलेल्या वस्तूंसाठी फक्त सलग नामांकनांना परवानगी आहे. त्यामुळे नव्या नियमानुसार हे अधिक स्पष्ट आणि संरचित उत्तराधिकार सुनिश्चित करणार आहे. तसेच दावेदारांमधील वाद देखिली कमी होईल असे नियामकांचे मत आहे.

बँकिंग कंपन्या (नामांकन) नियम, २०२५ लवकरच प्रकाशित केले जातील ज्यामध्ये नामांकने करण्यासाठी किंवा अद्यतनित करण्यासाठी फॉर्म आणि प्रक्रिया लिखित स्वरूपात स्पष्ट करण्यात येतील. ग्राहकांसाठी हे बदल कौटुंबिक किंवा आर्थिक परिस्थितीनुसार विद्यमान नामांकनांचे पुनरावलोकन आणि अद्यतनित करण्याची संधी उपलब्ध करून देतात. ठेवीदार आता अनेक लाभार्थ्यांसाठी योजना आखू शकतात, जेणेकरून त्यांचे निधी, मौल्यवान वस्तू किंवा सुरक्षित ताबा वस्तू कायदेशीर गुंतागुंतीशिवाय त्यांच्या इच्छेनुसार वितरित केल्या जाऊ शकतील असे नव्या नियमनात स्पष्ट केले गेले आहे.

## राज्यातील बांगलादेशी घुसखोरांना दणका!

## राज्य सरकारचे मोठे पाऊल, रेशनकार्ड पडताळणीचे आदेश

**मुंबई(प्रतिनिधी)**– गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात बांगलादेशी नागरिकांची घुसखोरी वाढत चालली आहे. याकरता राज्यभरात बांगलादेशी घुसखोरांविरोधात राज्य सरकारने कारवाईचा वेग वाढवला असून, घुसखोरी रोखण्यासाठी फडणवीस सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. त्यामुळे राज्यात येणाऱ्या बांगलादेशी घुसखोरांना आता आळा बसणार आहे.

बांगलादेशी राज्यात आल्यावर वास्तव्यासाठी विविध पुरावे, दस्तावेज सादर करताना बनावट कागदपत्रांचा वापर करतात. त्यामुळे बांगलादेशींची ब्लॅकलिस्ट तयार करा, तसेच रेशनकार्ड पडताळणी करण्याचे निर्देश राज्य सरकारने दिले आहेत. तसेच नवीन शिधापत्रिकेसाठी नव्या मार्गदर्शक सूचनाही जारी करण्यात आल्या आहेत.

दहशतवाद विरोधी पथकाकडून प्राप्त गुन्हा दाखल झालेल्या १,२७४ बेकायदेशीर बांगलादेशी स्थलांतरितांच्या यादीतील व्यक्तींच्या नावावर कोणतेही अधिकृत दस्तऐवज जारी झाले आहेत का, याची खातरजमा करावी. जर असे दस्तऐवज आढळले, तर त्यांचे रद्दीकरण, निलंबन किंवा निष्क्रियता करण्याची आवश्यक कार्यवाही तात्काळ करावी व सदर आदेशाची प्रत दहशतवाद विरोधी पथकाकडे माहितीस्तव पाठवावी. या व्यतिरिक्त उघडकीस येणाऱ्या बेकायदेशीर बांगलादेशी स्थलांतरितांची यादी तयार करून ती विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी या विभागाच्या संगणक कक्षाकडे पाठवावी. ज्यायोगे क्षेत्रिय कार्यालये आणि विभागीय कार्यालये यांना दक्षता घेता येईल. स्थानिक प्रतिनिधीच्या शिफारशीवरून शिधापत्रिका वितरीत करण्यात येत असल्यास अर्जदाराने सादर केलेल्या कागदपत्रांची किंवा राहण्याच्या ठिकाणाची कडक पडताळणी करावी, असेही निर्देश देण्यात आले आहेत.


**जागा विकणे आहे**

**राष्ट्रीय महामार्ग हायवेवर लोहा ते सोनखेड दरम्यान आंबेसांगवी गावाजवळील बसस्टॉप शेजारी असलेली रोड टच दोन गुंठे जागा अर्जंट विकणे आहे. तरी गरजू व्यक्तींनी खालील मोबाईल नंबरवर संपर्क साधावा.**

**मोबाईल नंबर**
**९३२५२४४५४६**
**९४२१७६५०७०**


## शिक्षक होण्याची सुवर्णसंधी; 'सीटीईटी'ची अधिसूचना जाहीर



**मुंबई :** केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षेचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. या वेळापत्रकानुसार केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा ८ फेब्रुवारी २०२६ रोजी होणार आहे. ही परीक्षा देशातील १३२ शहरांमध्ये वीस भाषांमध्ये घेतली जाईल. परीक्षेचे तपशील, अभ्यासक्रम, भाषा, पात्रता निकष, परीक्षा शुल्क, परीक्षा शहरे आणि महत्त्वाच्या तारखा यासंबंधीची सविस्तर माहिती CTET च्या वेबसाईटवर मिळेल.

**अर्ज शुल्क :** अर्ज शुल्क हे ऑनलाईन भरावे. ओपन आणि ओबीसी उमेदवारांसाठी एका पेपरचे १००० रुपये आहे. तर दोन्ही पेपरसाठी १२०० रुपये शुल्क आहे. एससी, एसटी आणि पीडब्ल्यूडी उमेदवारांसाठी एका पेपरसाठी ५०० रुपये आणि दोन्ही पेपरसाठी ६०० रुपये शुल्क आहे.

**परीक्षेचे स्वरूप :** सीटीईटी परीक्षा दोन पेपरमध्ये विभागलेली आहे. पेपर १ हा इयत्ता पहिली ते पाचवी पर्यंत शिकवू इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी आहे. पेपर २ हा इयत्ता सहावी ते आठवी पर्यंत शिकवू इच्छिणाऱ्यांसाठी आहे. परीक्षेत १५० बहुपर्यायी प्रश्न अर्थात MCQs असतील. तसेच निगेटिव्ह मार्किंग पद्धत नसेल.


**प्रथम पुण्यस्मरण**



**स्व. सौ. शेवंताबाई पोचिराम आईलवार**

**विनम्र अभिवादन**

अभिवादनकर्ते : आईलवार परिवार सुजलेगाकर



**Change In Name**

My Old Name is NUNE RAMESH GANGADHARRAO which now I am changing to (New Name) RAMESH GANGADHAR NUNE Hence forth my all correspondence be done as per my New Name. Please consider the same.

Address-H. No. 1-14-775, SADBHAVANA VIDYUT NAGAR NANDED-431605

Mo. No. 9823131361



**कुत्रीचे पिल्ले विकणे आहे**

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# रामदास सुमठाणकर यांनी राष्ट्रवादीही सोडली

## अनेकांनी दिले राजीनामे



**नांदेड (प्रतिनिधी)** – भारतीय जनता पक्षात चार वर्षे आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जवळपास एक वर्षे काम केल्यानंतर पक्षाचे नेते, उपमुख्यमंत्री अजित पवार नांदेड जिल्हा दौऱ्यावर येण्याच्या पूर्वसंध्येला पक्षाच्या दिव्यांग सेलचे प्रदेशाध्यक्ष रामदास पाटील सुमठाणकर यांनी आपल्या पदाचा आणि पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. त्यांच्यासोबत देगलूर येथे राष्ट्रवादीचे ४ माजी नगराध्यक्ष, १८ माजी नगरसेवक आणि ४ माजी जिल्हा परिषद सदस्यांनीही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी दिली असल्याचे सांगण्यात येत आहे. उपमुख्यमंत्री अजितदादांच्या नांदेड दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीचे हे सर्व पदाधिकारी, नगरसेवक काँग्रेसच्या वाटेवर असल्याचेही सांगण्यात येत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, उपमुख्यमंत्री अजित पवार हे २५ ऑक्टोबर रोजी नांदेड जिल्हा दौऱ्यावर आले होते. पवार यांच्या उमरी आणि देगलूर येथे जाहीर सभा झाल्या. या सभांची जय्यत तयारी सुरू असतानाच आणि काही तासातच उपमुख्यमंत्री अजित पवार हे नांदेड जिल्हा दौऱ्यावर पोहोचण्या आधीच पक्षाच्या दिव्यांग सेलचे प्रदेशाध्यक्ष रामदास पाटील सुमठाणकर यांनी आपल्या पदाचा आणि पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. त्यांच्यासोबत देगलूर येथे राष्ट्रवादीचे ४ माजी नगराध्यक्ष, १८ माजी नगरसेवक आणि ४ माजी जिल्हा परिषद सदस्यांनीही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी दिली आहे.

सुमठाणकर यांनी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष यांना पाठवलेल्या पत्रात आपण आपल्या काही खासगी कारणांमुळे आपल्या पदाचा राजीनामा देत असल्याचे म्हटले आहे. विशेष म्हणजे उपमुख्यमंत्री तथा पक्षाचे नेते अजित पवार यांची देगलूर येथेही सभा झाली आहे. या सभेच्या काही तास आधीच पक्षातील पदाधिकाऱ्यांनी हे राजीनामे दिले आहेत.

# खा. डॉ. अजित गोपछडे यांचे अंत्योदय कार्यालय भाजपा कार्यकर्ते व लोककल्याणासाठी समर्पित -खा. अशोकराव चव्हाण



**नांदेड (प्रतिनिधी)** – खा. डॉ. अजित गोपछडे यांचे अंत्योदय कार्यालय हे केवळ खा. डॉ. अजित गोपछडे यांच्यापुरतेच मर्यादित नसून ते भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि लोककल्याणासाठी समर्पित आहे, असे प्रतिपादन माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांनी केले. खा. डॉ. अजित गोपछडे यांच्या वतीने अंत्योदय कार्यालयात नुकताच दिवाळीनिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते.

यावेळी माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोकराव चव्हाण यांच्यासह संघटन मंत्री संजय कौडगे, आ. भीमराव केराम, आ. राजेश पवार, जिल्हाध्यक्ष संतुकराव हंबर्डे, किशोर देशमुख, माजी आमदार तथा म हानगराध्यक्ष अमरनाथ राजूरकर, नरेंद्र चव्हाण, चैतन्यबापू देशमुख, दिलीप कंदकुर्ते, सचिन पाटील उमरेकर, किशोर स्वामी, विजय येवनकर, मनोज भंडारी, लक्ष्मण ठक्करवाड, दत्ता कोकाटे, सदाशिव पुरी, शीतल खांडील, राज यादव, भाजपचे कार्यकर्ते, पदाधिकारी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या सोहळ्याचे प्रास्ताविक कार्यक्रम संयोजक खा. डॉ. अजित गोपछडे यांनी केले. पंतप्रधान नरेंद्र म ोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली देशाची आणि राज्याची विकासाची घोडदौड सुरू आहे. सर्व घटकांचा सर्व समावेशक विकास भारतीय जनता पार्टी आणि महायुती सरकारमुळे होतो आहे. आगामी काळात नांदेड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आपण सर्वजण प्रयत्न करणार आहोत, असा विश्वास खा. डॉ. अजित गोपछडे यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमात पुढे बोल-ताना माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण म्हणाले की, खऱ्या अर्थाने भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांना आता अच्छे दिवस येत आहेत. आगामी काळ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा असल्याने आपण सर्व कार्यकर्ते जोमाने कामाला लागावे. पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिकेवरही भारतीय जनता पार्टीचा विजयाचा झेंडा फडकला पाहिजे. जे कार्यकर्ते निवडून येण्याच्या क्षमतेचे आहेत त्या कार्यकर्त्यांना, पदाधिकाऱ्यांना उमेदवारी दिली जाईल. त्यामुळे कार्यकर्त्यांनी, पदाधिकाऱ्यांनी आपली क्षमता राखून ठेवून काम करावे. निश्चितपणे आपण सत्तेतले असल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आपण सत्तेत जाणार आहोत, असा विश्वास खा. डॉ. अजित गोपछडे यांनी व्यक्त केला.

# नांदेड-लोकमान्य टिळक टर्मिनल (एलटीटी), नांदेड विशेष गाडी चालविण्याचा निर्णय

**नांदेड (प्रतिनिधी)**-सणासुदीच्या काळात प्रवाशांच्या वाढत्या गर्दीचा भार कमी करण्यासाठी दक्षिण मध्य रेल्वेमार्फत नांदेड लोकमान्य टिळक टर्मिनल (एलटीटी) नांदेड अशी विशेष गाडी चालविण्यात येणार आहे.

गाडी क्रमांक ०७०३१ नांदेड-लोकमान्य टिळक टर्मिनल (एलटीटी) विशेष ही गाडी रविवार, दिनांक २६ ऑक्टोबर रोजी रात्री २१:०० वाजता नांदेडहून सुटेल आणि पुढील दिवशी दुपारी १५.१० वाजता लोकमान्य टिळक टर्मिनल (एलटीटी) येथे पोहोचेल.

गाडी क्रमांक ०७०३२ लोकमान्य टिळक टर्मिनल- नांदेड विशेष ही गाडी सोमवार, दि. २७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी १६:१० वाजता लोकमान्य टिळक टर्मिनल (एलटीटी) वरून सुटेल आणि मंगळवार, दि. २८ ऑक्टोबर रोजी सकाळी ११:३० वाजता नांदेड येथे पोहोचेल. ही गाडी पूर्णा, परभणी, गंगाखेड, परळी, लातूर रोड, लातूर, मुरुड, धाराशिव, बार्शी टाउन, कुर्डूवाडी, दौंड, पुणे, लोणावळा, कल्याण, ठाणे येथे दोन्ही दिशेला थांबते. ट्रेनमध्ये वातानुकूलित, स्लीपर आणि जनरल कोच आहेत २० कोचेस आहेत.

# श्रीनिकेतन शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचा आज स्नेहमेळावा

**नांदेड-** दीपक नगर तरोडा बुद्रुक भागातील श्रीनिकेतन हायस्कूलच्या २००२-२००३ दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा रविवार, दि. २६ ऑक्टोबर रोजी हॉटेल चार्मी फॅमिली रेस्टॉरंट निळा रोड, नांदेड येथे आयोजित करण्यात आला आहे.

या मेळाव्यास संस्थेच्या अध्यक्षा सौ. अरूणा नरवाडे, श्रीनिकेतन हायस्कूलचे मुख्याध्यापक यशवंत थोरात यांच्यासह शिक्षक, सेवानिवृत्त शिक्षक उपस्थित राहणार आहेत. या स्नेह मेळाव्यास श्रीनिकेतन शाळेतील माजी विद्यार्थी, शिक्षकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन ज्ञानेश्वर शिरसाट, सोनूताई बहात्रे, मोनिका भोकरे, पूजा हाटकर, मुरली कमठम, गौतम थोरात, अरुण पोहरे व माजी विद्यार्थ्यांनी केले आहे.

# धनादेश चोरून दुसऱ्याच्या नावे वठविणाऱ्यांविरुद्ध वजिराबाद ठाण्यात गुन्हा

## फसवणुकीचा नवा पायंडा

**नांदेड (प्रतिनिधी)** – शहराच्या वजिराबाद परिसरात असलेल्या दोन बँकांमध्ये फसवणूक करण्याच्या उद्देशाने ४ लाख ५३ हजार ७५५ रुपयांचे दोन धनादेश चोरून नेऊन दुसऱ्या बँकेमध्ये दुसऱ्याच खातेदाराच्या नावावर जमा करण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. यावरून वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखा वजिराबाद येथील अधिकारी किरणकुमार गोविंदराव जिंतूरकर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दि. १० ऑक्टोबर रोजी सकाळी ११.१० ते ११.१६ या सहा मिनिटाच्या वेळेत बँकेतील व्यवस्थापक, सहकारी कर्मचारी यांच्या निष्काळजीपणाचा फायदा घेवून दोन अनोळखी व्यक्तींनी धनादेश भरत असताना जी पावती भरावी लागते त्यात दुरुस्ती करायची आहे असे म्हणून महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा वजिराबादचा धनादेश जो धनादेश योगेश माधवराव अलबलवाड यांच्या नावाचा होता, तो घेतला आणि बँकेतून चोरून नेला. या धनादेशावर २ लाख ५३ हजार ७५५ रुपयांची रक्कम नमूद होती.

चोरी करणाऱ्यांनी धनादेश बँक ऑफ बडोदा शाखा आनंदनगर येथे नेऊन अमर टेपेकर या व्यक्तीच्या नावावर जमा केला. वजिराबाद पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा क्रमांक ४३८/२०२५ दाखल केला आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक जाधव करत आहेत. तर दुसऱ्या घटनेत डॉक्टर्स लेन येथील स्टेट बँक ऑफ इंडियाचे शाखाधिकारी राजू अनंत कदम यांनी दिलेल्या तक्रारीनुसार ८ ऑक्टोबर रोजी दुपारी १.२८ ते १.३८ अशा १० मिनिटांच्या वेळेत बँकेतील अधिकारी आणि त्यांचे सहकारी कर्मचारी यांची दिशाभूल करून धनादेश भरताना भराव्या लागणाऱ्या पावतीमध्ये बदल करायचा आहे, म्हणून द नांदेड मर्चंटस् को. ऑ. बँकेचा शोईब खान शखील खान यांच्या नावाचा दोन लाख रुपयांचा धनादेश चोरून नेला. त्यामध्येसुध्दा धनादेशधारकाच्या नावामध्ये बदल करून त्यावर अमर टेपेकर असे नाव टाकले आणि तो धनादेश सुध्दा बँक आफ बडोदा शाखा आनंदनगर येथे जमा केला. वजिराबाद पोलिसांनी या प्रकरणात सुध्दा गुन्हा दाखल केला आहे. याही प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक माडगे करत आहेत.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भाषणावेळी घोषणाबाजी

## उमरी येथील प्रकार



**नांदेड (प्रतिनिधी)** – राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांच्या उपस्थितीत शनिवार, दि. २५ ऑक्टोबर रोजी सकाळी उमरी येथे पक्षप्रवेश मेळाव्यात शेतकऱ्यांनी कर्जमाफीचा मुद्दा उपस्थित करत जोरदार घोषणाबाजी केली. यामुळे सभेत काही काळ गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती.

शेतकऱ्यांच्या या घोषणाबाजीमुळे पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला आणि काही शेतकऱ्यांना ताब्यात घ्यावे लागले. उमरी येथे आयोजित मेळाव्यात शिरीष गोरठेकर आणि कैलास गोरठेकरांसह अन्य काही जणांचा अजित पवार गटात प्रवेश झाला.

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी मंत्री नवाब मलिक आणि आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर उपस्थित होते. अजित पवार यांचे भाषण सुरू असताना काही शेतकरी अचानक उठले आणि शेतकऱ्यांची कर्जमाफी झालीच पाहिजे, शेतकऱ्यांना कर्जमुक्त करा अशा घोषणा दिल्या. सुमारे तीन ते चार मिनिटे चाललेल्या या घोषणाबाजीमुळे सभेत एकच गोंधळ उडाला. शेतकऱ्यांनी शेतकरी अडचणीत आहे, कर्जमाफीवर बोला अशी मागणी शेतकऱ्यांनी लावून धरली, त्यामुळे अजित पवारांना आपले भाषण थांबवावे लागले.

यावर बोलताना अजित पवार यांनी आजपर्यंत तीन वेळा कर्जमाफी झाली आहे. एकदा केंद्र सरकारने आणि दोनदा राज्य सरकारने कर्जमाफी दिली. सध्या आर्थिक संकटामुळे कर्जमाफीची घोषणा योग्य वेळी होईल, असे उत्तर दिले. मात्र, शेतकऱ्यांनी आजच कर्जमाफी जाहीर करा, असा आग्रह धरला. यामुळे सभेतील गोंधळ वाढला. बंदोबस्तासाठी उपस्थित असलेल्या पोलिसांनी हस्तक्षेप करत काही शेतकऱ्यांना सभास्थळावरून बाहेर काढले आणि ताब्यात घेतले. सभा संपल्यानंतर त्यांना सोडून देण्यात आले.

# शोभाबाई प्रतापसिंह ठाकूर यांचे निधन



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – हडको कंथक नगर येथील ज्येष्ठ महिला नागरीक शोभाबाई प्रतापसिंह ठाकूर यांचे वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८० वर्षे होते. त्यांच्या पश्चात संतोषसिंह प्रतापसिंह ठाकूर, कैलास ठाकूर, रमेशसिंह ठाकूर, मालतीबाई लक्ष्मणसिंह कार्तिक, मुलगी, नातू, पणतू असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिव देहावर रामघाट शनि मंदिर नांदेड येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# सुप खारट झाल्याच्या कारणावरून बार चालकास बेदम मारहाण

## हदगाव तालुक्यातील चक्री येथील घटना

**नांदेड (प्रतिनिधी)** – हदगाव तालुक्यातील चक्री शिवारात असलेल्या मैत्री बारवर दारू आणि जेवणासाठी गेलेल्या काही जणांनी संगनमत करून सुप खारट झाल्याचे कारण पुढे करत बारचालकास बेदम मारहाण केली. ही घटना २२ ऑक्टोबर रोजी रात्री साडेआठच्या सुमारास घडली.

हदगाव तालुक्यातील चक्री शिवारात रामेश्वर उत्तमराव गिरी यांचे मैत्री बार चालते. या बारवर उंचेगाव तालुका हदगाव येथील राहणारे शिवाजी देवराव बंडे, शिवाजी देशमुख आणि प्रशांत शिंदे हे जेवणासाठी गेले होते. तिथे गेल्यानंतर या तिघांनी इतर बारा जणांना सोबत घेऊन सुप खारट झाल्याच्या कारणावरून बारचालक रामेश्वर गिरी यांना जबर मारहाण केली. यात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून, सध्या ते रुग्णालयात उपचार घेत आहेत. त्यांच्या फिर्यादीवरून हदगाव पोलीस ठाण्यात शिवाजी बंडे, शिवाजी देशमुख, प्रशांत शिंदे आणि इतर बारा साथीदारांविरुद्ध गंभीर दुखापत केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक बर्गे करत आहेत.

# चंद्रकलाबाई कदम यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** – बामणी पट्टी (ता. कंधार) येथील रहिवासी तथा ज्येष्ठ नागरिक चंद्रकलाबाई टिकाराम कदम-पाटील (७२) यांचे २५ ऑक्टोबर रोजी अपघाती निधन झाले. त्यांच्या पार्थिव देहावर शनिवार, दि. २५ ऑक्टोबर रोजी दुपारी तीन वाजता बामणी पट्टी (ता. कंधार) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, तीन मुली, जावई व नातवंडे असा परिवार आहे. सेवानिवृत्त मुख्याध्यापक तथा मराठा सेवा संघाचे पदाधिकारी भगवानराव ताटे यांच्या त्या ज्येष्ठ भगिनी तर बामणी येथील शेतकरी बालाजी कदम यांच्या मातोश्री होत.

# 'घरासमोरील नाली काढ' असा दम देऊन मारहाण करणाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)** – शहराच्या देगलूर नाका परिसरातील रहेमतनगर येथे महानगरपालिकेचा सफाई कामगार काम करत असताना त्याला धमकावून आमच्या घरासमोरील नाली का काढली नाही असे म्हणून शिवीगाळ करत मारहाण केली. या प्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार २४ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेसातच्या सुमारास घडला.

महानगरपालिकेत सफाई कामगार म्हणून काम करणारा संदीप रामराव पाईकराव (वय ३२) हा देगलूर नाका, रहेमतनगर भागात नालीसफाईचे काम करत होता. दि. २४ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेसातच्या सुमारास याच भागात राहणारे अनोळखी तीन जण त्याच्या जवळ आले. आमच्या घरासमोरील नाली का काढली नाही असे म्हणून त्यांना शिवीगाळ करत दम दिला. एवढेच नाही तर थापड-बुक्क्यांनी मारहाण करून शासकीय कामात अडथळा निर्माण केला. संदीप पाईकराव यांच्या फिर्यादीवरून इतवारा पोलीस ठाण्यात अनोळखी तीन जणांविरुद्ध शासकीय कामात अडथळा, मारहाण कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गवळी करत आहेत.

**पान १ वरून...**

**न भूतो न भविष्यती...**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शनिवारी मुंबई महानगर पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात राज्यात सध्या होणाऱ्या निवडणुकांसाठी ९६ लाख खोटे मतदार महाराष्ट्राच्या यादीत भरले असल्याचा गंभीर आरोप केला होता. राज ठाकरे यांनी मुंबईमध्ये ८ ते १० लाख, ठाण्यामध्ये ८ ते ८.५ लाख, तसेच पुणे आणि नाशिकमध्येही अशाच प्रकारे खोटे मतदार भरले गेल्याचा आरोप केला. निवडणूक आयोगाने जोपर्यंत मतदार यादी पूर्णपणे स्वच्छ होत नाही आणि सर्व राजकीय पक्षांचे समाधान होत नाही, तोपर्यंत महाराष्ट्रामध्ये निवडणुका घेऊ नयेत, अशी मागणी देखील केली होती. केंद्रात, राज्यात, महानगरपालिकेत, जिल्हा परिषदेत 'आम्हीच पाहिजे' यासाठी हे सर्व सुरू असल्याचा हल्लाबोल त्यांनी भाजपवर केला होता.

--------------

**स्थानिक स्वराज संस्था...**

यांच्यासह अनेक स्वातंत्र्यसैनिकांचा वारसा आज तुम्हाला मिळालेला आहे. तुम्ही फार भाग्यवान आहात. यापुढे ही राष्ट्रवादी पक्षाला साथ द्यावी असे आवाहन केले.

सध्या शेतकऱ्यांना पुन्हा उभे करण्यासाठी पुनर्वसनासाठी ३२ हजार कोटी रुपये लागतील. याआगोदर देशात सरकारने ७१ हजार कोटी रुपये कर्जमाफी केली. आता कर्ज माफी करायची की शेतकऱ्यांना मदत करायची. लाडक्या बहिणीला १५०० रुपये महिन्याप्रमाणे ४५ हजार कोटी रुपये वर्षाला द्यावे लागते, असेही त्यांनी सांगितले.

--------------

**न्यायमूर्ती सूर्यकांत भारताचे...**

कार्यकाळ मिळणार आहे.

सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांच्या न्यायाधीशांच्या नियुक्ती, बदली आणि पदोन्नतीचे नियमन करणाऱ्या कायद्यानुसार, सर्वोच्च न्यायालयातील सर्वात वरिष्ठ न्यायमूर्तींना सरन्यायाधीश म्हणून नियुक्त केले जाते. या परंपरेनुसार, न्यायमूर्ती सूर्यकांत हेच पुढील सरन्यायाधीश होतील, असे मानले जात आहे. ही निवड प्रक्रिया औपचारिकरित्या एका महिन्यापूर्वीच सुरू झाली आहे.

# 'महादेवा' योजनेंतर्गत १३ वर्षांखालील मुले व मुलींच्या फुटबॉल खेळाडू निवड चाचणीचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** – राज्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दूरदर्शी नेतृत्त्वाखाली प्रोजेक्ट महादेवा ही योजना महाराष्ट्रातील १३ वर्षांखालील मुलगा व मुलींच्या फुटबॉल कौशल्याचा शोध घेण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी सुरू करण्यात आली आहे. निवड प्रक्रिया तीन टप्प्यांत पार पडणार आहे.

जिल्हास्तरावरील निवड चाचण्या, प्रादेशिक फेरी आणि अंतिम निवड फेरी. अंतिम टप्प्यात ६० मुलांची निवड सीआयडीसीओ ग्राऊंड, खारघर येथे आणि ६० मुलींची निवड डब्ल्यूआयएफए कूपरेज मैदान, मुंबई येथे केली जाईल. यापैकी प्रत्येकी ३० मुल-मुलींची निवड केली जाईल आणि त्यांना पाच वर्षांची एकात्मिक शिष्यवृत्ती दिली जाईल, ज्यामध्ये फुटबॉल प्रशिक्षणासोबत शैक्षणिक विकासाचाही समावेश असेल. निवड झालेल्या खेळाडूंना १४ डिसेंबर रोजी मुंबईत येणाऱ्या आंतरराष्ट्रीय फुटबॉल स्टार लिओनेल मेस्सी यांच्या फुटबॉल क्लिनिकमध्ये सहभागी होण्याची अनोखी संधी मिळेल. ही योजना MITR, क्रीडा विभाग, WIF, CIDCO आणि VSTF यांच्या संयुक्त विद्यमाने राबविली जात असून, राज्यातील फुटबॉल क्षेत्र अधिक मजबूत करण्याचा उद्देश आहे. सर्व जिल्हे, संस्था आणि माध्यमांना व्यापक प्रसिद्धी देऊन अधिकाधिक नोंदणीसाठी प्रोत्साहन देण्याचे आवाहन करण्यात येत आहे. इच्छुक खेळाडूंनी निवड चाचण्यांपूर्वी दिलेल्या गूगल फॉर्मद्वारे नोंदणी २६ ऑक्टोंबरपर्यंत करणे आवश्यक आहे.

त्यानुषंगाने नांदेड जिल्हा अंतर्गत जिल्हास्तरीय महादेवा योजनेंतर्गत १३ वर्षाखालील मुले व मुलींच्या फुटबॉल खेळाडू निवड चाचणी आयोजन दि. ३० ऑक्टोंबर या कालावधीत उस्मानशाही मील फुटबॉल ग्राऊड, नांदेड येथे करण्यात आले आहे. याकरिता जिल्ह्यातील सर्व शाळांची समन्वय साधून खेळाडूंना चाचणीसाठी पाठवण्याबाबत सूचना द्याव्यात. सर्व खेळाडूंनी चाचणीस्थळी येण्यापूर्वी गुगल नोंदणी लिंक https://forms.gle/6P-R766JoC9d2QH26, https://forms.gle/ctCMRZ4FZDxwYEv7 या लिंकद्वारे (Google registration link) आपली नोंदणी पूर्ण केली आहे, याची खात्री करावी, खेळाडूंना त्यांचे मूळ आधार कार्ड आणि जन्म प्रमाणपत्र सोबत आणणे आवश्यक आहे.

राज्यात फुटबॉल खेळाच्या विकास व प्रसारासाठी व राज्यात फुटबॉल खेळाची लोकप्रियता वाढावी म्हणून फुटबॉल खेळातील तांत्रिक प्रशिक्षण, क्रीडा नैपुण्याचा शोध घेण्यासाठी तसेच योजनाबद्ध प्रशिक्षण, पायाभूत सुविधा यांना चालना मिळणार आहे. याकरिता जिल्ह्यातील जिल्हा व तालुक्यातील सर्व क्लब व शाळांनी या संधीचा लाभ घेण्यासाठी १३ वर्षाखालील मुले व मुलींनी महादेवा जिल्हास्तर फुटबॉल स्पर्धेत जास्तीत-जास्त संख्येने सहभागी व्हावे व अधिक माहितीकरिता विपुल दापके (क्रीडा अधिकारी) ९५११७२४०९५ व सय्यद साजीद (संघटना) ९८२३०३९८९२ यांचेशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी केले.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com